दैनिक **राष्ट्र सह्याद्री**
अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द
संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २८७
। शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ । पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## भरधाव पिकप पलटली : एकाचा मृत्यू,सहा जखमी



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील वासुंदे चौकात बुधवारी (दि.२९ जुलै) रात्री ११ वाजण्याच्या सुमारास भरगाव वेगात जााणारी बोलेरो पिकअप (क्रं एमएच १५ जेडब्ल्यू २८०४) वळणावर पलटी होऊन या वाहनाचा भीषण अपघात झाला. या अपघातात एका युवकाचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला. तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत.

तुषार भगवान भोसले (वय ३०, रा. दुबेर, ता.सिन्नर,जि. नाशिक) यांचा मृत्यू झाला. तर सुनील रामदास बोडके (रा. नाशिक), रवी कैलास शिंदे (रा.शिंदेगाव, जि. नाशिक), रविराज पाटील,(रा. कर्नाटक), सोनू इंद्रबहादुर सिंग (रा. उत्तर प्रदेश), राम गंगाराम रच्छा (रा. उत्तर प्रदेश) आणि कांतीलाल प्रभाकर गांगुर्डे (रा. पंचकेश्वर,ता. निफाड, जि.नाशिक) हे जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीबाबत वैद्यकीय निरीक्षण ठेवण्यात आले आहे.

## महत्वाचे...

### पिक विमा भरण्यास १५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**धाराशिव :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला असून प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत पिक विमा भरण्याची मुदत ३१ जुलैवरून १५ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे अद्याप विमा भरू न शकलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पिक विम्याची अंतिम मुदत ३१ जुलै असल्याने अनेक शेतकरी विविध कारणांमुळे अर्ज व विमा रक्कम भरू शकले नव्हते. त्यामुळे मुदतवाढ देण्याची मागणी सातत्याने होत होती. शिवसेना शिंदे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी याबाबत केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांना पत्र लिहून मुदत १५ ऑगस्टपर्यंत वाढवण्याची विनंती केली होती.शेतकरी पिक विमा योजनेच्या लाभापासून वंचित राहू नयेत, या उद्देशाने केंद्र सरकारने ही मागणी मान्य केल्याचे सांगितले जात आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी अतिरिक्त वेळ उपलब्ध होणार आहे.

# ‘मनुस्मृती’वरून संसदेत गदारोळ

## पेपरफुटी प्रतिबंधक सुधारणा विधेयक राज्यसभेतही मंजूर

**नवी दिल्ली :** सार्वजनिक परीक्षा (पेपरफुटी प्रतिबंध) सुधारणा विधेयकावरील चर्चेदरम्यान राज्यसभेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या 'मनुस्मृती' संदर्भातील वक्तव्यावरून जोरदार गदारोळ झाला. लोकसभेनंतर हे विधेयक राज्यसभेतही मंजूर करण्यात आले. चर्चेदरम्यान खरगे यांनी शैक्षणिक संस्थांमध्ये आरएसएसचा प्रभाव वाढत असल्याचा आरोप करत, मनुस्मृतीच्या विचारांचे अनुयायी शिक्षण व्यवस्थेत वाढत असून शूद्रांना शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याची मानसिकता रुजवली जात आहे, असे वक्तव्य केले. त्यांच्या या विधानावर सत्ताधारी सदस्यांनी तीव्र आक्षेप घेतला. केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी हे विधान तथ्यहीन व समाजात तेढ निर्माण करणारे असल्याचे सांगितले. त्यानंतर सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनी संबंधित उल्लेख कामकाजाच्या नोंदीतून वगळण्याचे निर्देश दिले.

खरगे यांनी सरकारवर पेपरफुटी रोखण्यात अपयश आल्याचा आरोप करत, केवळ शिक्षा वाढवून प्रश्न सुटणार नसल्याचे म्हटले. काही वर्षांत १५२ परीक्षा पेपरफुटीच्या विळख्यात सापडल्या, मात्र दोषींवर प्रभावी कारवाई झालेली नाही, असा दावा त्यांनी केला. शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता, राष्ट्रीय परीक्षा संस्थेतील रिक्त पदे भरणे आणि शिक्षणासाठी अर्थसंकल्पात अधिक निधी देण्याची मागणीही त्यांनी केली. विद्यार्थी आंदोलनाच्या दबावामुळेच केंद्र सरकारला दुरुस्ती विधेयक आणावे लागल्याचा आरोप करत, आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उत्तर द्यावे, अन्यथा राजीनामा द्यावा, अशी मागणीही खरगे यांनी केली. त्यांनी परीक्षा प्रणालीत मूलभूत सुधारणा न झाल्यास भविष्यातही पेपरफुटीच्या घटना घडत राहतील, **(उर्वरीत पान ४ वर)**



### आंदोलक विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे

**नीट (यूजी) परीक्षेतील कथित गैरप्रकारांविरोधातील आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई होणार नसल्याचे दिल्ली सरकारच्या गृह विभागाने स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर हा निर्णय घेण्यात आला असून, नोंदविण्यात आलेले १३ गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. मात्र, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना या निर्णयाचा लाभ मिळणार नाही.**

### राहुल गांधींविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव

**भाजप खासदार तथा केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या लोकसभेतील भाषणाविरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल केला आहे. राहुल गांधी यांनी भाषणादरम्यान स्टुडंट्स, इडियट आणि अंधभक्त या शब्दांचा वापर करून संसदीय परंपरांचा भंग केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित उल्लेख सभागृहाच्या कामकाजातून वगळण्यात आला असूनही विशेषाधिकार भंगाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.**

# पाकिस्तानच्या गोळीबारात ३७ जणांचा मृत्यू



**राष्ट्र सह्याद्री । विशेष प्रतिनिधी**

**पाकिस्तान :** पाकव्याप्त काश्मीर (पीओके)मध्ये गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या जनआंदोलनाने आता तीव्र वळण घेतले आहे. पाकिस्तानी सुरक्षा दलांनी आंदोलन दडपण्यासाठी केलेल्या कारवाईत ३७ हून अधिक नागरिकांचा मृत्यू, तर २०० पेक्षा अधिक जण जखमी झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली असून पाकिस्तान सरकार आणि लष्कराविरोधात मोठ्या प्रमाणावर घोषणाबाजी सुरू आहे.

आंदोलकांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक रामप्रसाद बिस्मिल यांच्या सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है... या ओळींचा आधार घेत आंदोलन अधिक तीव्र केले आहे. त्याचबरोबर इंकलाब जिंदाबादच्या **(उर्वरीत पान ४ वर)**

**✻ पीओकेमध्ये आंदोलनावर सुरक्षा दलांचा गोळीबार**
**✻ ३७ हून अधिक नागरिकांचा मृत्यू, २०० पेक्षा अधिक जखमी असल्याचा दावा**
**✻ सरफरोशी की तमन्ना... आणि इंकलाब जिंदाबादच्या घोषणांनी परिसर दणाणला.**
**✻ पाकिस्तान सरकार व लष्कराविरोधात नागरिकांचा तीव्र आक्रोश**
**✻ आंदोलनाचा स्थानिक वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरही परिणाम**

## बालविवाह पडला महागात.... मुलीच्या आई-वडिलांसह पाच जणांवर गुन्हा

### मंगल कार्यालयासह इतरांना क्लीनचिट बालविवाह प्रतिबंधक अधिकारी संशयाच्या फेऱ्यात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव / झरेकाठी :** मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असतानाही तिचे लग्न लावून दिल्याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात मुलीची आई-वडील, नवरदेव, सासू-सासरेसह पाच जणावर गुन्हे दाखल. मंगल कार्यालय चालक विवाह लावून देणारा भटजी, डी जे मालक यांना क्लीनचिट दिल्याने फिर्यादी वरच प्रश्न उपस्थित होत आहेत. यामुळे बालविवाह प्रतिबंध कायद्याची पायमल्ली स्वतः संबंधित बाल विवाह समितीच करते का? अशी चर्चा परिसरात सुरू आहे.

साकूर येथील संगमनेर रोडवरील राजा बिरोबा मंगल कार्यालयात हा बालविवाह झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी बालविवाह प्रतिबंधक अधिकारी तथा रणखांबवाडी गावचे ग्रामसेवक सागर परसराम रसाळ यांनी रात्री उशिराने घारगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत एकूण पाच जणावर बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ कलम ९,१०,११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आल्याने येथील परिसरात खळबळ उडाली आहे.

**(उर्वरीत पान ४ वर)**



## प्रवरेचे पाणी पाहण्यासाठी गेलेला तरुण वाहून गेला!



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** शहरातील गंगामाई घाट परिसरात प्रवरा नदीला आलेले पाणी पाहण्यासाठी गेलेला २५ वर्षीय तरुण पाण्याच्या वेगवान प्रवाहात वाहून गेला. ऋषिकेश नवनाथ गडाख (वय २५, रा. पारेगाव बुद्रुक) असे वाहून गेलेल्या तरुणाचे नाव आहे. ऋषिकेश हा आपल्या मित्रांसोबत प्रवरा नदी पात्रात आलेले पाणी पाहण्यासाठी गंगामाई घाटावर गेला होता. मात्र, नदीचा प्रवाह आणि पाण्याचा अंदाज न आल्याने तो पाण्यात वाहून गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**(उर्वरीत पान ४ वर)**

## वैजापूर व श्रीरामपूर तालुक्याच्या सीमेवर गोदावरीच्या प्रवाहात चारही बाजूंनी पाण्याने वेढलेले आणि हिरवाईने नटलेले आपले ऐतिहासिक आणि सुंदर ‘सराला बेट’!



पावसामुळे गोदावरीच्या कुशीत फुललेले 'सराला बेट' हे एक अप्रतिम आणि नैसर्गिक वैभव!

छाया : दीपक बरकसे, वैजापूर

# सिस्पे घोटाळेबाज राहुल काळोखे फिजीतून गजाआड

## केंद्रीय अन्वेषण ब्युरोची मोठी कारवाई




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** लाखाची गुंतवणूक करा आणि दरमहा ८ ते १० टक्के हमखास परतावा मिळवा, या भुरळ पाडणाऱ्या आमिषाला अनेक ठिकाणचे हजारो गुंतवणूकदार बळी पडले आणि त्यातून उभा राहिला कोट्यवधी रुपयांचा सिस्पे आर्थिक घोटाळा. या प्रकरणातील प्रमुख फरार आरोपी तथा विविध कंपन्यांचा संचालक राहुल शामराव काळोखे याला अखेर इंटरपोलच्या रेड नोटिसच्या आधारे फिजी या देशामधून अटक करून भारतात आणण्यात केंद्रीय अन्वेषण ब्युरोला यश मिळाले आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, श्रीगोंदा आणि पारनेर तालुक्यासह संपूर्ण राज्यात सीस-पे, इन्फिनिटी, बिकन, ग्लोबल ट्रेडिंग आदी कंपन्यांच्या माध्यमातून लाखाची गुंतवणूक करा आणि दरमहा ८ ते १० टक्के हमखास परतावा मिळवा, या भुरळ पाडणाऱ्या आमिषाला अनेक ठिकाणचे हजारो गुंतवणूकदार बळी पडले अश्या अवास्तव परताव्याचे आमिष दाखवत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक गोळा करण्यात आली. सुरुवातीला काही गुंतवणूकदारांना परतावा देऊन विश्वास संपादन करण्यात आला. त्यानंतर हजारो नागरिकांकडून कोट्यवधी रुपयांचा निधी उभारून त्याचा अपहार केल्याचा आरोप आहे. या घोटाळ्याप्रकरणी श्रीगोंदा, पारनेरसह महाराष्ट्रातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहेत. गुन्हे दाखल होताच नवनाथ औताडे यांच्यासह सर्वच संचालक भारताच्या बाहेत पळून गेले होते. त्यासह कंपनीचे संचालक राहुल काळोखे परदेशात फरार झाला होता. महाराष्ट्र पोलिसांच्या प्रस्तावानुसार केंद्रीय अन्वेषण ब्युरोने इंटरपोलमार्फत रेड नोटीस जारी केली. त्यानंतर तो फिजीमध्ये असल्याचे स्पष्ट झाल्याने तेथील अधिकाऱ्यांनी त्याला अटक केली.सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ३० जुलै रोजी भारतातून गेलेल्या विशेष पथकाने त्याला ताब्यात घेऊन भारतात आणले. आता त्याच्या चौकशीतून या बहुचर्चित गुंतवणूक घोटाळ्यातील इतर आरोपी, पैशांचा प्रवाह, परदेशातील व्यवहार आणि फसवणुकीचे संपूर्ण जाळे उघड होण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, या कारवाईमुळे अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या फसवणूकग्रस्त गुंतवणूकदारांच्या अपेक्षा पुन्हा उंचावल्या असून, आता इतर आरोपींवरही कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.त्यामुळे ठेवीदारांच्या गमावलेल्या आश्या पुन्हा प्रजवलीत झाल्या आहेत. श्रीगोंदा पारनेर सह विविध जिल्ह्यात फसवणूक प्रकरणाची माहिती मिळाली असून अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद गोरडे पोलीस हेडकॉन्स्टेबल अप्पासाहेब ढमाळे,अनिल आव्हाड यांचा या गुन्ह्याच्या तपासामध्ये समावेश होता.

## शिवसेना-धनुष्यबाण वाद



### सर्वोच्च न्यायालयात ४ ऑगस्टला अंतिम सुनावणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' चिन्हाच्या अधिकारासंदर्भातील महत्त्वाच्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी सुरू असून, न्यायालयाने दोन्ही पक्षांना सर्व मुद्दे संकलित करून सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीनंतर पुढील सुनावणी ४ ऑगस्ट रोजी निश्चित करण्यात आली आहे.

फेब्रुवारी २०२३ मध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्ह एकनाथ शिंदे गटाला दिले होते.

**(उर्वरीत पान ४ वर)**

# ज्येष्ठ नागरिकांच्या अर्जांवर ९० दिवसांत निर्णय बंधनकारक!

## निष्काळजी अधिकाऱ्यांवर होणार कारवाई; महसूलमंत्री बावनकुळे यांचा ईशारा

**राजू झनके । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणासाठीच्या प्रकरणांचा कायद्यानुसार ९० दिवसांच्या आत निपटारा होणे बंधनकारक असून, यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई सहन केली जाणार नाही असा इशारा देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत राज्यातील सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

राज्यात बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे विभक्त कुटुंब पद्धती वाढत असून, अनेक ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या मुलांकडून दुर्लक्ष, आर्थिक उपेक्षा आणि छळाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय उपचार यांसारख्या मूलभूत गरजांपासून अनेक ज्येष्ठ नागरिक वंचित राहत असल्याच्या तक्रारी सातत्याने वाढत आहेत. अशा प्रकरणांचा वेळेत निपटारा व्हावा आणि ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने जगता यावे, यासाठी शासनाने ही कठोर पावले उचलली आहेत.



आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, २००७ अंतर्गत उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली 'ज्येष्ठ नागरिक न्यायाधिकरण' कार्यरत आहे. मात्र, निवडणूक, कायदा-सुव्यवस्था आणि जमीन महसुलाच्या कामाच्या ताणामुळे या तक्रारींवर वेळेत सुनावणी होत नसल्याची बाब 'महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ' (फेस्कॉम) यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. महिने न महिने तक्रार अर्ज प्रलंबित राहणे ही गंभीर बाब असल्याचे सांगत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महसूल विभागाने सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.



**(उर्वरीत पान ४ वर)**

### महसूल विभागाच्या प्रमुख मार्गदर्शक सूचना

**✻ तात्काळ नोंदणी व पोहोच पावती : ज्येष्ठ नागरिकांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी सादर केलेल्या अर्जाची त्याच दिवशी स्वतंत्र नोंदवहीत नोंदणी करून अर्जदाराला तातडीने पोहोच पावती देणे अनिवार्य आहे.**

**✻ कमाल ९० दिवसांत निकाल : कायदा व नियमांनुसार अर्ज दाखल झाल्यापासून कमाल ९० दिवसांच्या आत अंतिम आदेश पारित करणे बंधनकारक करण्यात आले असून विनाकारण सुनावणीच्या तारखा पुढे ढकलण्यास मनाई करण्यात आली आहे.**

**✻ समुपदेशनाला प्राधान्य : कौटुंबिक सलोखा टिकून राहण्यासाठी सुनावणीच्या पहिल्या टप्प्यात सामोपचाराने व समुपदेशनाने प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल.**

**✻ भत्त्याची वसुली व पोलीस मदत : न्यायाधिकरणाने किंवा अपिलीय प्राधिकरणाने मंजूर केलेल्या चरितार्थ भत्त्याची रक्कम मुलांकडून किंवा नातेवाईकांकडून वेळेत वसूल होत आहे की नाही, याची शहानिशा पोलिसांच्या मदतीने केली जाईल.**

**✻ विभागीय आयुक्तांचा मासिक आढावा : सर्व विभागीय आयुक्तांनी त्यांच्या क्षेत्रातील जिल्हाधिकाऱ्यांच्या मासिक बैठकीत या कायद्यांतर्गत दाखल, निकाली व प्रलंबित प्रकरणांचा विशेष आढावा घ्यावा.**

**✻ ज्येष्ठ नागरिक मदत कक्ष : प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात 'ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष' कार्यान्वित करून प्राप्त तक्रारींचे योग्य ट्रॅकिंग करण्याचे आदेश दिले आहेत.**

# अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अतिरेक नको, सामाजिक जबाबदारीचे भान हवे..!




लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे. परंतु हा अधिकार अमर्याद नसून त्याच्यासोबत सामाजिक जबाबदारीही जोडलेली असते. विशेषतः सार्वजनिक जीवनातील व्यक्ती, लोकप्रतिनिधी किंवा लोकप्रिय कलाकार यांनी केलेले प्रत्येक विधान लाखो लोकांपर्यंत पोहोचत असते आणि त्याचा समाजमनावर दूरगामी परिणाम होत असतो. अशा वेळी शब्दांची निवड, संवेदनशीलता आणि सामाजिक भान या गोष्टी अधिक महत्त्वाच्या ठरतात.

अलीकडे खासदार व अभिनेत्री कंगना राणावत यांनी दिल्लीतील तरुणांच्या आंदोलनाबाबत केलेली बिभत्स आणि आक्षेपार्ह टिप्पणी मोठ्या वादाचे कारण ठरली आहे. आंदोलनकर्त्या तरुणांविषयी वापरलेली भाषा, त्यांच्या आंदोलनाची केलेली हेटाळणी आणि त्यातून व्यक्त झालेला उपरोधिक दृष्टिकोन यामुळे सामाजिक माध्यमांपासून राजकीय वर्तुळापर्यंत तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. अनेक विद्यार्थी संघटना, सामाजिक कार्यकर्ते, विरोधी पक्ष तसेच काही तटस्थ नागरिकांनीही या वक्तव्याचा निषेध केला. तर समर्थकांनी हे त्यांच्या वैयक्तिक मतस्वातंत्र्याचे उदाहरण असल्याचे सांगत त्यांचे समर्थन केले. यामुळे पुन्हा एकदा अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सामाजिक जबाबदारी यावरील चर्चा केंद्रस्थानी आली आहे.

लोकशाहीत आंदोलन हा संविधानाने दिलेला लोकशाही मार्ग आहे. आंदोलनाशी मतभेद असू शकतात; त्यामागील भूमिका चुकीची वाटू शकते; आंदोलनाची पद्धतही टीकेस पात्र ठरू शकते. मात्र आंदोलन करणाऱ्या व्यक्तींचा अवमान करणे, त्यांच्या भावना दुखावणारी भाषा वापरणे किंवा त्यांची मानहानी करणारी विशेषणे लावणे, ही लोकशाही संस्कृतीशी सुसंगत बाब मानता येणार नाही. मतभेद हे विचारांशी असावेत; व्यक्तीच्या सन्मानाशी नव्हे.

कंगना राणावत यांचे हे पहिलेच वादग्रस्त वक्तव्य नाही. गेल्या काही वर्षांत त्यांनी अनेकदा अशा प्रकारची विधाने करून चर्चेचे केंद्र बनण्याचा अनुभव घेतला आहे. भारताला १९४७ मध्ये मिळालेले स्वातंत्र्य "भीक" असल्याचे आणि "खरे स्वातंत्र्य २०१४ मध्ये मिळाले" असे त्यांनी केलेले विधान देशभर वादग्रस्त ठरले होते. स्वातंत्र्यसैनिकांचा अपमान झाल्याचा आरोप करत अनेकांनी त्यांच्यावर टीका केली होती.

याशिवाय, शेतकरी आंदोलनादरम्यान आंदोलनकर्त्यांविषयी त्यांनी केलेली अवमानकारक टिप्पणी, आंदोलनात सहभागी झालेल्या वृद्ध महिलांबद्दल केलेले वक्तव्य, पंजाबमधील भावना दुखावल्याचा आरोप, विविध चित्रपटसृष्टीतील कलाकारांविषयी केलेली वैयक्तिक टीका, मुंबईची तुलना पाकिस्तानव्याप्त काश्मीरशी करणारे विधान, तसेच अनेक राजकीय नेत्यांवर केलेली आक्रमक भाष्ये या सर्व घटनांमुळे त्यांची प्रतिमा स्पष्टवक्तीपेक्षा वादग्रस्त वक्तव्ये करणारी अशी अधिक तयार झाली आहे.

सार्वजनिक व्यक्तींना स्पष्ट मत मांडण्याचा अधिकार नक्कीच आहे. परंतु प्रसिद्धी मिळविण्यासाठी किंवा राजकीय भूमिका ठळक करण्यासाठी समाजात तणाव निर्माण करणारी भाषा वापरणे ही धोकादायक प्रवृत्ती ठरू शकते. सामाजिक माध्यमांच्या युगात एका वाक्याचा प्रभाव लाखो लोकांवर पडतो. त्यामुळे जबाबदारीही तितकीच मोठी असते.

दिल्लीतील तरुणांचे आंदोलन हे केवळ एका प्रश्नापुरते मर्यादित नसून रोजगार, शिक्षण, स्पर्धा परीक्षा, पारदर्शकता आणि भविष्याविषयीची अस्वस्थता व्यक्त करणारे आंदोलन म्हणूनही पाहिले जात आहे. या पार्श्वभूमीवर आंदोलनकर्त्यांच्या भावना समजून घेण्याऐवजी त्यांची खिल्ली उडविणारी भाषा वापरणे अनेकांना असंवेदनशील वाटले, यात आश्चर्य नाही. देशातील युवक आज बेरोजगारी, स्पर्धा परीक्षांतील गैरव्यवहार, वाढती स्पर्धा आणि आर्थिक अनिश्चितता यांचा सामना करत आहेत. त्यांच्या प्रश्नांकडे सहानुभूतीने पाहण्याची गरज असताना त्यांच्यावर टीकेची झोड उठविणे सामाजिक दरी अधिक वाढवू शकते.

याचबरोबर समाजानेही प्रत्येक वादग्रस्त वक्तव्याला केवळ राजकीय रंग देण्याऐवजी सार्वजनिक संवादाची गुणवत्ता वाढविण्यावर भर दिला पाहिजे. एका चुकीच्या विधानाला उत्तर म्हणून द्वेषपूर्ण भाषा वापरणे किंवा वैयक्तिक ट्रोलिंग करणे हा देखील योग्य मार्ग नाही. विचारांना विचारांनी उत्तर देणे हीच लोकशाहीची खरी ताकद आहे.

आजच्या राजकारणात आणि सामाजिक माध्यमांच्या संस्कृतीत वादग्रस्त विधानांमुळे प्रसिद्धी मिळविण्याची स्पर्धा वाढताना दिसते. गंभीर विषयांवर संयमी चर्चा करण्यापेक्षा धक्कादायक वक्तव्ये अधिक वेगाने व्हायरल होतात. ही प्रवृत्ती लोकशाहीच्या आरोग्यासाठी हितावह नाही. समाजाला दिशादर्शक ठरणाऱ्या व्यक्तींनी लोकप्रियतेपेक्षा जबाबदारीला प्राधान्य दिले पाहिजे.

कंगना राणावत यांच्या ताज्या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले आहे की सार्वजनिक जीवनात शब्द हे शस्त्रापेक्षाही प्रभावी असतात. ते समाजाला जोडू शकतात, पण तेवढ्याच सहजतेने समाजात फूटही पाडू शकतात. म्हणूनच अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार जपत असताना संवेदनशीलता, सभ्यता आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. लोकशाहीची खरी शक्ती विरोधी मतांचा सन्मान करण्यात आहे; विरोधकांचा अपमान करण्यात नाही. सार्वजनिक व्यक्तींनी हे भान राखले, तर समाजातील संवाद अधिक परिपक्व, विधायक आणि लोकशाही मूल्यांना पूरक ठरेल.

# कळसाचे दर्शन म्हणजेच विठ्ठलाचे दर्शन

## परमार्थातच खरी ताकद : ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : देवळाली प्रवरा येथील श्री योगीराज त्रिंबकराज पायी दिंडी सोहळ्याची सांगता भक्तीमय वातावरणात झाली. सांगता सोहळ्यानिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनात ह.भ.प. महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी वारकरी संप्रदायातील भक्ती, समता आणि परमार्थाचे महत्त्व प्रभावीपणे विशद केले.



कीर्तनात त्यांनी सांगितले की, पंढरीच्या विठ्ठल मंदिराच्या कळसाचे दर्शन जरी झाले तरी वारकऱ्यांना प्रत्यक्ष विठ्ठलाचे दर्शन झाल्याचा आनंद मिळतो.त्या दर्शनाने वारकरी तृप्त होतो.जसा भुकेला माणूस जेवणानंतर तृप्तीचा ढेकर देतो, त्याचप्रमाणे वारकरी दरवर्षी पंढरीच्या दर्शनाने आत्मिक समाधान प्राप्त करतो. पंढरीच्या वारीचे वर्णन शब्दांत करणे अशक्य असून तिचा अनुभव प्रत्यक्ष घ्यावा लागतो, असे त्यांनी सांगितले.

"परमार्थामध्ये मोठी ताकद आहे. संतांनी कधीही जातीचा विचार केला नाही, ना स्वतःची जात सांगितली, ना कोणाची जात विचारली. त्यांनी समाजाची सेवक म्हणून सेवा केली," असे सांगत त्यांनी वारकरी संप्रदायाच्या समतेच्या विचारांचा गौरव केला.

यावेळी संत तुकाराम महाराजांचा "कोणी एकी भुलली नारी, विकितां गोरस म्हणे घ्या हरी..." हा अभंग निरूपणासाठी घेत भक्तीचा गूढ अर्थ उलगडून सांगितला. तसेच विनोबा भावे यांनी पांडुरंगाच्या चरणी मस्तक टेकवून अश्रूंनी व्यक्त केलेल्या भावनेचा दाखला देत, त्या चरणांना ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज, एकनाथ महाराज यांसारख्या संतांचा स्पर्श झाल्यानेच भावे यांना त्या संतांचे दर्शन झाल्याची अनुभूती झाली होती, असे त्यांनी सांगितले.

देवळाली प्रवरा हे योगीराज त्रिंबकराज, बाबुराव पाटील आणि संत महिपती महाराज यांच्या दिंडी परंपरेमुळे भक्तिरसाने नटलेले गाव असल्याचे गौरवोद्गारही मंडलिक महाराजांनी काढले.

या सोहळ्यात चिंचपूर, चांदेगाव, करजगाव, देवळाली प्रवरा, मुसळवाडी, जातप आदी भागांतील भजनी मंडळांनी सहभाग घेतला. तुकाराम महाराजांचे वंशज एकनाथ महाराज मोरे, ह.भ.प. सिताराम ढुस, दिंडी सोहळ्याचे अध्यक्ष बाबा महाराज मोरे, सुरेशशेठ वाबळे, सोमनाथ महाराज माने, आबा महाराज कोळसे, हिराताई महाराज मोकाटे, नामदेव महाराज शास्त्री जाधव, सुभाष महाराज विधाटे, बाबासाहेब महाराज वाळूंज यांच्यासह देवळाली, सोनगाव, आंबी, उक्कलगाव, मातापूर, लोणी परिसरातील मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

# शेळी चोरीचा प्रयत्न फसला

## एका ताब्यात, दोघे फरार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील देवळाली प्रवरा येथे मंगळवारी (दि.२८) जुलै रोजी रात्री शेळ्या चोवण्याचा प्रयत्न शेतकऱ्याने उधळून लावला. किरण दळवी यांच्या शेडमधून चोरटे दोन शेळ्या बाहेर काढत असताना, शेळ्यांच्या आवाजामुळे दळवी यांना जाग आली. त्यांनी तातडीने धाव घेत एका चोरट्याला रंगेहाथ पकडले.

राहुल रमेश धोत्रे असे पकडलेल्या आरोपीचे नाव असून, त्याचे इतर दोन साथीदार अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. दळवी यांनी 'डायल ११२' वर संपर्क साधून पोलिसांना बोलावले आणि आरोपीला त्यांच्या स्वाधीन केले. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार दोघांचा शोध सुरू आहे.

# दुचाकी चालविण्याचे नव्हे, पेन चालविण्याचे वय ; पोलीस निरीक्षक बोरसे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : "विद्यार्थ्यांचे वय हे रस्त्यावर दुचाकी चालविण्याचे नसून हातात पेन धरून आपले भविष्य घडविण्याचे आहे. वाहतुकीचे नियम पाळत शिक्षणालाच पहिले प्राधान्य द्यावे," असे आवाहन घारगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी केले.

अकलापूर (ता. संगमनेर) येथील श्री दत्त विद्यालयात इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित कायदेविषयक व सामाजिक जनजागृती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत वाहतूक नियम, मुलींची सुरक्षा, व्यसनमुक्ती, सायबर गुन्हे आणि बालविवाह प्रतिबंध याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

अल्पवयीन मुलांनी दुचाकी चालविणे हा गंभीर कायद्याचा भंग असून त्यामुळे स्वतःसह इतरांच्या जीवितालाही धोका निर्माण होतो. पालकांनीही आपल्या पाल्यांच्या हाती वाहने देऊ नयेत, असा इशारा त्यांनी दिला. सोशल मीडियाचा वापर करताना वैयक्तिक माहिती, बँक तपशील, ओटीपी किंवा पासवर्ड कोणालाही देऊ नये, तसेच मुलींच्या छेडछाडीच्या घटना घडल्यास तातडीने शिक्षक, पालक किंवा पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण महाले, पोलीस पाटील सीताराम आभाळे, मुख्याध्यापक अशोक काकडे, विलास साठे, नितीन ढमढेरे, संभाजी वाघ, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# गुरुंबद्दलची श्रध्दा शेवटच्या श्वासापर्यंत जपा : प्रकाशानंदगिरी महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : अहिल्यानगर येथील संत किसनगिरी नगर येथील गुरुदत्त भक्तीधाम येथे श्री समर्थ सदगुरु किसनगिरी बाबा यांच्या आशीर्वादाने व राष्ट्र संत भास्करगिरी महाराज यांच्या प्रेरणेने गुरु पौर्णिमेचा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. मानवाच्या कल्याणासाठी सद्गुरूंची कृपा असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन श्री क्षेत्र देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांनी यावेळी बोलतांना केले.



यावेळी बोलतांना स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज म्हणाले की गुरु महिमा अगाध व अपरंपार आहे. गुरुपौर्णिमा उत्सव हा गुरुंविषयी कृतज्ञता भाव व्यक्त करण्याचा सोहळा आहे. गुरूंच्या मार्गदर्शनाने जीवनातील अंधकार दूर होत असल्याने मानव जातीच्या कल्याणासाठी सदगुरूंची कृपा असणे आवश्यक आहे त्यासाठी जीवनात गुरूंबद्दल असलेल्या श्रद्धेला शेवटच्या श्वासापर्यंत जपा असा संदेश देवगड देवस्थानचे उत्तराधिकारी परमपूज्य श्री स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांनी दिला.

अहिल्यानगर येथील पाइपलाईन रोड नजीक संत किसनगिरीनगरमध्ये गुरु दत्त भक्तीधाम मंदिरामध्ये गुरु पौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांचे प्रवचन झाले. यावेळी स्वामींच्या हस्ते गुरुदत्त भक्ती धाम मध्ये असलेल्या भगवान श्री दत्तात्रय श्री समर्थ सद्‌गुरू किसनगिरी बाबांची महाआरती करण्यात आली. यावेळी झालेल्या गुरुपौर्णिमा उत्सव सोहळयाच्या प्रसंगी आर्थिक गुन्हे शाखेचे डीवायएसपी गणेश उगले, कवी दत्तात्रय वारकड,नगरसेवक सागर बोरुडे, भैय्या गंधे, श्री समर्थ सद्गुरु किसनगिरीबाबानगर येथील भक्त मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाआरतीनंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# श्रीरामपूर नगरपालिकेकडुन चार कर रद्द

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : नगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत नागरिकांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. नगरपालिकेकडून आकारले जाणारे विशेष शिक्षण कर, अग्निशामक कर, नोटीस व वॉरंट फी हे चार कर रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय गुरुवारी पार पडलेल्या विशेष सभेत घेण्यात आला. तसेच, चतुर्थ वार्षिक कर आकारणी सन २०२६ – २७ या आर्थिक वर्षापासून लागू करण्याचा ठरावही बहुमताने मंजूर करण्यात आला. यावेळी, नगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात लोकनियुक्त नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली ही सर्वसाधारण तथा विशेष सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी उपनगराध्यक्षा कांचन सानप, मुख्याधिकारी मनोज उर्कीर्डे यांच्यासह दीपक वमने, दिलीप नागरे, श्रीनिवास बिहाणी, हाजी अजूंम शेख, मुजफ्फर शेख, आशिष धनवटे, संतोष कांबळे, स्नेहल खोरे, वैशाली चव्हाण, दीपक चव्हाण, नगरसेवक व अधिकारी उपस्थित होते. पालिकेने आतापर्यंत ३२ हजार ४४८ मालमत्तांची तपासणी केली असून त्यावर ७ हजार ५०७ नागरिकांनी हरकती नोंदवल्या आहेत. नागरिकांना पाठवलेल्या नोटिसा नसून त्या 'सूचना' आहेत, असे स्पष्ट करत घरपट्टी आकारताना कोणावरही अन्याय होणार नाही, आणि प्रत्येकाचे समाधान होईपर्यंत नवीन घरपट्टी लागू केली जाणार नाही, असे आश्वासन नगराध्यक्ष करण ससाणे यांनी दिले.

# जुगार व अवैध दारू अड्ड्यांवर पोलिसांचे छापे

## १३ लाख ९७ हजारांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीरामपूर शहरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर छापे टाकत ८ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले. तसेच या कारवाईत आरोपींकडून सुमारे १३ लाख ९७ हजार ८३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहेत. यामध्ये रोख रक्कम, मोबाईल, जुगाराचे साहित्य, वाहने तसेच देशी-विदेशी मद्याच्या बाटल्यांचा समावेश आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड तसेच पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, शामसुंदर जाधव, भगवान थोरात, रमिझराजा आतार आणि विशाल तनपुरे यांचे विशेष पथक तयार करण्यात आले. या पथकाने श्रीरामपूर शहर व परिसरात माहिती संकलित करून (दि.२८ ) जुलै रोजी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई केली.

या कारवाईत महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार अरुण संजय बोरुडे (वय २८, रा. घरकुल, अक्षय कॉर्नर, श्रीरामपूर), दिपक बाळासाहेब यादव (वय २८, रा. खटकळी रोड, यादववस्ती, श्रीरामपूर) आणि सचिन भैरव नवले (वय ३४, रा. सुभाषवाडी, बेलापूर, ता. श्रीरामपूर) यांच्यावर कारवाई करण्यात आली. या गुन्ह्यात स्वामी परदेशी (रा. बेलापूर, ता. श्रीरामपूर) व अश्पाक जाहागिरदार (रा. वॉर्ड क्र. २, श्रीरामपूर) हे फरार आहेत. या कारवाईत १ लाख ४५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दुसऱ्या कारवाईत रविंद्र महादेव गायकवाड (वय ३०, रा. संगमनेर रोड, नॉर्दन बँच, श्रीरामपूर) याला ताब्यात घेण्यात आले. तर अश्पाक जाहागिरदार (रा. वॉर्ड क्र. २, श्रीरामपूर) हा फरार झाला. या कारवाईत ७ लाख ३३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्याअन्वये नितेश अमरिकलाल कंत्रोड (वय ४३, रा. जयभोले चौक, गोंधवणी रोड, श्रीरामपूर) याच्यावर कारवाई करण्यात आली.

# वृक्षारोपण काळाची गरज

## प्रत्येकाने झाड लाऊन त्याचे संगोपन करावे : जाधव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : वृक्षारोपण ही काळाची गरज असून कुटुंबातील प्रत्येकाने एक वृक्षाची लागवड करून त्याचे संगोपन देखील गरणे आवश्यक आहे. गावाचा परिसर हिरवाईने नटावा, पर्यावरणाचा समतोल राखला जावा आणि भावी पिढ्यांना निरोगी व स्वच्छ वातावरण मिळावे असे आवाहन शिल्लेगांव गटाच्या जिल्हा परिषद सदस्या सविता संतोष जाधव यांनी केले.

एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत तालुक्यातील वजनापूर येथे शिल्लेगांव गटाच्या जिल्हा परिषद सदस्या सविता संतोष जाधव यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले यावेळी त्या बोलत होत्या.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत गंगापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वजनापूर–शेकटा गावात जिल्हा परिषद सदस्या सविता संतोष जाधव यांच्या आयोजनातून एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत सदस्या सविता जाधव यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी, ग्रामस्तरावर कार्यरत असलेल्या विविध विभागांचे कर्मचारी, ग्रामस्थ, माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# नारायणगिरी महाराजासारख्या गुरूमुळे अडबंनाथ देवस्थान उदयास आले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : जीवनात सदगुरू नारायणगिरी महाराज यांच्यासारखे कल्पतरू रूपी श्रीगुरू हे आम्हाला लाभले. हे आमचे भाग्य असून अशा थोर सदगुरूच्या कृपाशीर्वादाने माळराना वरील एक लिंबाचे झाडाखालील शिळेचे श्रीक्षेत्र अडबंनाथ देवस्थान उदयास आले असल्याचे प्रतिपादन संस्थानचे मठाधिपती स्वामी अरूणनाथगिरी महाराज यांनी गुरूपौर्णिमा उत्सव सोहळ्याचे किर्तनातून भाविकांना उपदेश करताना केले.

श्रीक्षेत्र अडबंगनाथ देवस्थान येथे मोठ्या उत्साहात गुरूपौर्णिमा उत्सव सोहळा साजरा करण्यात आला. सकाळी अडबंगनाथ मंदिरातील तपशीळेसह ध्यान मंदिरातील सदगुरू गंगागिरी महाराज,सदगुरू नारायणगिरी महाराज यांच्या मुर्तीची अभिषेक पुजन करण्यात आले.सकाळी ११.३० वाजता अडबंगनाथ संस्थानचे मठाधिपती अरूणनाथगिरी महाराज यांच्या सुश्राव्य किर्तनास प्रारंभ झाला. किर्तन प्रसंगी श्रीगुरू सारीखा असता पाठिराखा,इतरांचा लेखा कोण करी. या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या अभंगाचे विवेचतून भाविकांना उपदेश केला.प्रारंभी अभंगांचा भावार्थ सांगताना महाराज पुढे म्हणाले की. समर्थ श्रीगुरू आपल्याला प्राप्त झाले तर इतरांचा लेखा कोण करीन. राजेच्या कांतेला जशी कुणाकडे काही मागण्यांची गरज नाही. तशी समर्थ सदुरूंच्या शिष्यास कुणापुढे काही मागण्यांची गरज नाही. असे समर्थ सदगुरू आपल्याला प्राप्त झाले तर कुणाकडे काही मागण्यांची गरज काय.दुसऱ्या दृष्टांतात महाराज म्हणतात कल्पतरूच्या वृक्षाखाली जो बसतो त्यास जीवनात काय कमी पडणार.असे कल्पतरू रूपी सदगुरू ज्याला मिळाले . फलश्रुती काय ज्या सद्गुरूंच्या कृपेने मी ऊध्दरून गेलो तरून गेलो.आता ऊध्दरलो कशामुळे? श्रीगुरूची प्राप्ती झाल्याने,अशा सद्गुरूंची आपण जीवनात प्राप्ती करून घ्या असे ज्ञानेश्वर महाराज या अभंगातून उपदेश करतात.



यावेळी आ. ललीता पाटील धुळे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, सर्जे राव कोते, ताराचंद तनपुरे, अर्जुन पानसंबळ, नानासाहेब म्हसे, भगवान झडे, दशरथ वर्पे , शिवाजी रहाटळ, साहेबराव औताडे, नगरसेवक वसंत गोंदकर, बाबा घोगरे, बाळासाहेब जठार, भाऊसाहेब मुठे, आण्णासाहेब आसने, लक्ष्मण आसने, बाळासाहेब हुरूळे, अशोक मुठे, राहुल महाराज, कैलास महाराज दुशिंग , देवीदास महाराज, दिपक महाराज, लखन गिरी महाराज, आप्पासाहेब महाराज, राम महाराज, धर्मनाथ महाराज, किरण महाराज आदी उपस्थित होते. किर्तनानंतर संजय मच्छिंद्र चौधरी, नांदुर्खी परिवाराचे वतीने महाप्रसाद पगंत देण्यात आली.

# आदर्श विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** - येथील आदर्श विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सरस्वतीचे पूजन करून मान्यवर शिक्षकांचा आणि गुरुजनांचा सन्मान करण्यात आला. १७ विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून गुरुबद्दलचे विचार व महत्त्व सांगितले. प्रास्ताविकातून तनुश्री कोठवळ हिने गुरुपौर्णिमेचे महत्व व गुरु बद्दलची अपार श्रद्धा त्यातून निर्माण झालेली लोकसंस्कृती किती श्रेष्ठ आहे ते सांगितले. शिक्षक अशोक दराडे यांनी मानवी जीवनातील गुरुंचे स्थान त्यामुळे निर्माण होणारे धारिष्ट्य व बळावला जाणारा आत्मविश्वास याबाबत माहिती दिली. व्यास महर्षींनी महाभारतासारख्या ग्रंथातून जीवनाचे सूत्र तर माऊलींच्या विचारातून गरुविषयीची श्रध्दा आणि निष्ठा याची परंपरा व माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक सुभाष पवार यांनी शुभेच्छा देऊन गुरुंचे विचार जीवनात आचरणात आणण्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची गडाख व सिध्दी लोहकरे यांनी तर आभारप्रदर्शन धनश्री येळवंते हिने केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजेंद्र डाके, चांगदेव दरंदले, दत्तात्रय गुलदगड यांच्या सह सर्व शिक्षक व इयत्ता १० वी ब मधील विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### बालाजी देडगाव ग्रामपंचायत व लोकवर्गणीतून आंब्याच्या रोपांचे वाटप



**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील देडगाव ग्रामपंचायतने यात्रा वर्गणीच्या उरलेल्या पैशातून नागरिकांना अल्प दरात नर्सरीमधून आणलेल्या कलम केलेल्या आंब्याच्या रोपांचे वाटप केले. गाव व परिसरात वृक्षांची संख्या वाढवून पर्यावरण विकासासाठी या उपक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी सरपंच चंद्रकांत मुंगसे, माजी सरपंच दत्ता पाटील मुंगसे, माजी चेअरमन बाबासाहेब मुंगसे, माजी उपसरपंच बाळासाहेब मुंगसे, उपसरपंच आनंद दळवी, कृषी अधिकारी संजय कदम, केंद्रप्रमुख भास्कर तांबे, भाऊसाहेब सावंत, खंडू कोकरे, आकाश चेडे, उध्दव मुंगसे, सारंगधर मुंगसे, ग्रामविकास अधिकारी संतोष उल्हारे, पत्रकार बन्सीभाऊ एडके, युवा नेते निलेश कोकरे, शिवाजी लांघे, माजी उपसरपंच महादेव पुंड, अंबादास मुंगसे, बाळासाहेब कदम, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

तसेच ग्रामपंचायतच्या वतीने चिंच, आवळा यासारख्या वृक्षांचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना सरपंच चंद्रकांत मुंगसे म्हणाले की, देडगाव व परिसरामध्ये जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्याचा ग्रामपंचायतचा मानस असून दरवर्षी याप्रमाणे वृक्षांचे वाटप करण्यात येणार आहे.

### नगरसेवक सागर तनपुरे यांनी जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांना दिला पाठिंबा



**राहुरी** : दिल्ली येथील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनात राहुरी येथील केशर उद्योग समूहाचे नगरसेवक सागर तनपुरे व केशर मित्रमंडळाने प्रत्यक्ष उपस्थित राहून सहभाग दर्शविला. आंदोलनस्थळी आंदोलकांसाठी विविध प्रकारच्या खाद्य पदार्थांची व्यवस्था करून त्यांचे वितरण करण्यात आले. सरकारने आंदोलकांच्या मागण्या मान्य केल्यानंतर जंतर-मंतरवर झालेल्या विजयी जल्लोषात राहुरीचे कार्यकर्तेही उत्साहाने सहभागी झाले.

यावेळी बोलताना सागर तनपुरे यांनी, देशहितासाठी भविष्यात कॉक्रोच जनता पार्टी तर्फे किंवा विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी होणार्या कोणत्याही आंदोलनात केशर मित्र मंडळ सक्रिय सहभाग नोंदवेल, अशी भूमिका व्यक्त केली. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राहुरीहून एकनाथ बर्डे, योगेश रोकडे, गणेश पवार, वरुण गुलदगड, विजय उंडे, प्रकाश तनपुरे, नितीन वराळे, राम सरोदे यांच्यासह अनेक कार्यकर्ते दिल्ली येथे उपस्थित होते.

### कृषीदूतांचे बांधावर जाऊन आधुनिक शेतीचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन

**झरेकाठी** : प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था संचलित प्रवरा कृषी महाविद्यालयाने खंडाळा येथे आयोजित केलेल्या शेतकरी शिवार फेरीत कृषीदूतांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आधुनिक शेतीचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान विस्ताराचा प्रभावी संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमात आले पिकातील कंदकुज रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन तसेच आधुनिक शेळीपालनातील वैज्ञानिक पद्धतींची माहिती देण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या प्रेरणेने, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे व संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम झाला. प्रा. श्रीकृष्ण हुरुळे यांनी आले पिकावरील रोग व्यवस्थापन, तर डॉ. गोरक्षनाथ अंत्रे यांनी शेळीपालनातील पोषण, आरोग्य व उत्पन्नवाढीच्या उपाययोजनांवर मार्गदर्शन केले.

प्रगतशील शेतकरी चंद्रकांत मुंढे, मदन चौधरी, कृषी अधिकारी मीनाक्षी बढे व परिसरातील शेतकरी उपस्थित होते. प्रत्यक्ष शेतात तज्ज्ञांकडून समस्यांचे निरसन झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. अमोल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीदूतांनी उपक्रम यशस्वी केला.

# निळवंडे पाटात सोडले जाते मळीचे दूषित पाणी; प्रशासनाचे दुर्लक्ष

## पाण्याची तपासणी करून कारवाई करावी ; निळवंडे महिला ग्रामस्थांची मागणी





**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : निळवंडे पाटात कारखान्यातील मळीमिश्रित लालसर रंगाचे दूषित पाणी सोडण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. हे दूषित पाणी पाटातून खालील भागात वाहत असल्याने पाटालगतच्या गावांतील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पाण्यामुळे शेती, जनावरे तसेच पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवरही विपरीत परिणामहोण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित विभागाने त्यामुळे च्या पाण्याची तातडीने तपासणी करून पाणी सोडणार्यांवर कारवाई करावी अशी मागणी निळवंडे येथील महिला ग्रामस्थांनी केली आहे

निळवंडे धरणातून पाठात पाणी सोडण्यात येणार आहे त्या अगोदरच या पाठात कारखान्याच्या मुळीचे पाणी सोडण्यात आले त्यामुळे त्या पाण्याचा रंग बदलून लालसर झाला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकां मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दूषित पाण्यामुळे विविध संसर्ग जन्य आजारांचा धोका वाढू शकतो, अशी चिंता स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.या गंभीर प्रकारची दखल घेऊन संबंधित विभागाने पाण्याचे नमुने गोळा करून प्रयोग शाळेत तपासणी करावी, तसेच हे पाणी नेमके कोणत्या कारखान्यातून सोडण्यात आले याचा शोध घेऊन दोर्षींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निळवंडे येथील महिला व ग्रामस्थांनी केली आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्यात याव्यात, दूषित पाणी पाटात सोडण्याचे प्रकार त्वरित थांबवावेत आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासनाने प्रभावी यंत्रणा उभी करावी, अशीही मागणी होत आहे.

या गंभीर प्रकरणाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन वस्तुस्थितीची चौकशी करावी, आणि नागरिकांच्या आरोग्याशी खेळणार्यांच्या विरोधात कठोर कारवाई करावी, अन्यथा कुठल्याही प्रकारची पूर्व कल्पना न देता वडगाव पान ते कोपरगाव या मार्गावर रस्ता रोको आंदोलन केले जाईल असा इशारा निळवंडेच्या सरपंच शशिकला पवार सदस्य ताराबाई केरे पार्वताबाई केरे मीना केरे निर्मला केरे लक्ष्मण केरे तांटामुक्ती अध्यक्ष शिवाजी आहेर यांनी दिला आहे.

## आश्वी खुर्द अंगणवाडीत सापांचा वावर

### ‘भाऊ प्रतिष्ठान’चा उपोषणाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी / आश्वी** : संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द येथील ग्रामपंचायत कार्यालयालगत असलेल्या अंगणवाडी परिसरात वाढलेल्या गवतामुळे सापांचा वावर वाढल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अवघ्या दोन तासांच्या अंतरात धामण जातीचे दोन साप आढळून आले. सर्पमित्र शिवा पवार यांनी तत्काळ दोन्ही साप पकडून नैसर्गिक अधिवासात सोडल्याने संभाव्य अनर्थ टळला.



नवीन अंगणवाडी इमारतीभोवती कंबरभर गवत वाढले असून शेजारील जुनी पत्र्याची इमारत, विटांचा ढिगारा व अस्वच्छतेमुळे परिसर धोकादायक बनला आहे. पावसाळ्यात डासांचे प्रमाणही वाढल्याने डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर 'भाऊ प्रतिष्ठान'चे अध्यक्ष विकास साहेबराव गायकवाड यांनी ग्रामपंचायत प्रशासनाच्या दुर्लक्षावर तीव्र नाराजी व्यक्त केली. अंगणवाडी परिसरातील गवत व घाण तातडीने हटविण्याची मागणी त्यांनी सचिव सतीश निवृत्ती गायकवाड यांच्या सह निवेदनाद्वारे सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामसेवकांकडे केली आहे. तातडीने स्वच्छता न झाल्यास आमरण उपोषणाचा इशाराही त्यांनी दिला असून ग्रामपंचायत प्रशासनाच्या भूमिकेकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## श्रीरामपूरात जैन साध्वींचे चातुर्मासासाठी आगमन; भव्य मिरवणुकीत स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज रोडवरील श्री स्थानकवासी जैन स्थानकात चातुर्मासानिमित्त उपप्रवर्तिनी पैंसठिया यंत्र तेला तप आराधिका चंदनबाला व बुलंद वाणी जिनशासन प्रभाविका पद्मावती यांच्यासह सात साध्वींचे आगमन झाले. श्री स्थानकवासी जैन संघाच्या वतीने त्यांचे भव्य मिरवणुकीद्वारे स्वागत करण्यात आले. आचार्य डॉ. शिवमुनी, भावी अनुशास्ता युवाचार्य भगवान महेंद्र ऋषी आणि महाराष्ट्र प्रवर्तक कुंदन ऋषिजी यांच्या चातुर्मास आज्ञेनुसार दक्षिण सिंहनी गुरुणीमैय्या अजितकुमारी यांच्या सुशिष्यांसह तपोकेसरी चारुप्रज्ञाजी, विद्याभिलाषी सूर्यवंदनाजी, शासनवंदना, वितरागवंदना व नवदीक्षित आप्तवंदना या साध्वींचा चातुर्मास श्रीरामपूर येथे होत आहे.

या स्वागत सोहळ्यासाठी पुणे, कोल्हार, जामखेड, राहता, राहुरी, देवळीप्रवरा, चिंचवड, बेलापूर, वडगाव शेरी आदी ठिकाणांहून मोठ्या संख्येने जैन श्रावक-श्राविका उपस्थित होते. भव्य मिरवणुकीनंतर जैन स्थानकात प्रवेश करण्यात आला. बुधवार, २९ जुलैपासून सुरू झालेला चातुर्मास पुढील चार महिने श्री स्थानकवासी जैन संघाच्या जैन स्थानकात होणार असून, या काळात दररोज प्रवचन, जप, धर्मआराधना व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. संघाचे अध्यक्ष रमेश इंद्रभान लोढा यांनी सर्व जैन बांधवांनी कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

याच कालावधीत उपप्रवर्तिनी चंदनबाला यांच्या मार्गदर्शनाखाली ६५ दिवसीय ‘पैंसठिया छद अनुष्ठान’ २९ जुलै ते १ ऑक्टोबरदरम्यान आयोजित करण्यात आले असून, त्याअंतर्गत पाच विशेष धार्मिक अनुष्ठानांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व जैन श्रावक-श्राविकांनी या धर्मआराधनेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## इप्का फार्मास्युटिकल्समध्ये प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या ९२ विद्यार्थ्यांची निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर / झरेकाठी** : प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, प्रवरानगर संचलित इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोणी येथील प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये औषधनिर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य इप्का फार्मास्युटिकल्स प्रा. लि. कंपनीने ९२ विद्यार्थ्यांची अंतिम निवड केली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीकडून नियुक्तीपत्रेही प्रदान करण्यात आली असून या यशामुळे महाविद्यालयाच्या प्लेसमेंट उपक्रमाला मोठे यश मिळाले आहे. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या प्रेरणेने कार्यरत असलेल्या संस्थेच्या या उपक्रमात एकूण २८४ विद्यार्थ्यांनी

> ‘ प्रवरेचा विद्यार्थी शिक्षणाबरोबरच रोजगारक्षम बनावा, या उद्देशाने संस्थेमार्फत उद्योगांशी सामंजस्य करार, प्रक्षेत्र भेटी, आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास यावर सातत्याने भर दिला जातो. प्रत्येक महाविद्यालयात स्वतंत्र प्लेसमेंट विभाग कार्यरत असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होत आहेत. ’
>
> **डॉ. सुस्मिता विखे**
> **मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रवरा ग्रामीण**

सहभाग घेतला होता. कंपनीच्या विविध पदांसाठी झालेल्या मुलाखतीत विद्यार्थ्यांच्या ज्ञान, कौशल्य आणि व्यक्तिमत्त्वाची विविध टप्प्यांमध्ये चाचणी घेऊन अंतिम निवड जाहीर करण्यात आली.

मुलाखत प्रक्रियेसाठी कंपनीच्या वतीने असिस्टंट मॅनेजर सनत देसाई, सिनिअर एक्झिक्युटिव्ह वजीर इनामदार, राजदीप गोहिल, असिस्टंट जनरल मॅनेजर अंकुर रावल तसेच मनीष पटेल उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांची मुलाखत घेऊन गुणवंत उमेदवारांची निवड केली, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र जाधव यांनी दिली. हा प्लेसमेंट उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाचे अमोल दिघे, प्रमोद डेंगळे, आप्पासाहेब शेळके तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत प्रवरा कन्या विद्या मंदिरचा संघ विजेता

### विभागीय स्पर्धेसाठी पात्र



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धेत लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कन्या विद्या मंदिरच्या मुलींच्या फुटबॉल संघाने शानदार कामगिरी करत जिल्हात अजिंक्यपद पटकावले.

या स्पर्धेत संघाने उपांत्य फेरीत आत्मा मलिक सीबीएसई विद्यालयाच्या संघावर ६-० असा दणदणीत विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामना प्रवरा कन्या विद्या मंदिर आणि प्रवरा पब्लिक स्कूल यांच्यात रंगला. या सामन्यात प्रवरा कन्या विद्या मंदिरच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत ६-१ अशा फरकाने विजय मिळवून जिल्हा विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. या विजयामुळे प्रवरा कन्या विद्या मंदिरचा संघ विभागीय स्पर्धे साठी पात्र ठरला अशी माहीती प्राचार्या विद्या घोरपडे यांनी दिली.

प्रवरा कन्या विद्या मंदीरचा संघ अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. विजयी संघात ज्ञानेश्वरी शिंदे, कार्तिकी आमटे, आरती शेळके, सुकन्या मुरकुंडे, सोनाक्षी सातव, प्रगती आंधळे, सोनम माने, खुशी गवळी, ईश्वरी बडक, अक्षरा सोलंकर, संजीवनी कोळपे, स्वरा हिरवे, आर्या सोळुंके, श्रद्धा विधाते, प्रणिती ढवळे आणि अनन्या काळे यांचा समावेश होता. खेळाडूंना प्राचार्य विद्या घोरपडे, डॉ. उत्तम अनाप, सुचित्रा तांबे यांचे मार्गदर्शन लाभले.

## शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा त्रिमूर्ती विद्यालयात गौरव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती प्राथमिक विद्यालय व श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत विशेष यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्काराद्वारे गौरव करण्यात येऊन त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन प्रोत्साहित करण्याचा हा सोहळा नुकताच उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान या संस्थेच्या उपाध्यक्षा स्नेहलताई चव्हाण या होत्या. तर शिक्षण विभागाचे प्रवरासंगम केंद्राचे केंद्रप्रमुख रविंद्र कडू पाटील, मुकिंदपुर ग्रामपंचायतचे माजी सरपंच अरुण निपुंगे, विभाग प्रमुख नामदेव ताके, मिलिंद सोनवणे,अंजली होन, निवासी प्राचार्य एकनाथ कापसे, पालक प्रतिनिधी रामदास बानकर व जेजुरकर व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात प्राचार्य सोपान काळे यांनी प्रास्ताविकात शिष्यवृत्ती परीक्षेच्या महत्त्वावर विशेष प्रकाश टाकला. यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते रायटिंग बोर्ड व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

तर यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षक अर्जुन भांड, सुचिता जाधव,प्रियांजली कराड,दत्तू गर्जे, लहू गिरी यांना सन्मानित करण्यात आले. रविंद्र कडू यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच संस्कारांचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मण दळे यांनी केले. आभार विभाग प्रमुख नामदेव ताके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

# राहुरीचे ग्रामदैवत बुवा सिद्ध देव यात्रा उत्सव भक्तिमय वातावरणात सुरु



> **वादग्रस्त फलक हटवल्याने समाधान**
>
> मंदिरासमोर काही दिवसांपूर्वी लावण्यात आलेल्या वादग्रस्त फलकावर हिंदू परंपरेनुसार पूजा-विधी करू नयेत, असा उल्लेख असल्याने भाविकांमध्ये नाराजी पसरली होती. यात्रेदरम्यान तणाव निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने हस्तक्षेप करत हा फलक हटविला. त्यामुळे सकल हिंदू समाज व भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शहराचे ग्रामदैवत बुवा सिद्ध देव यांच्या वार्षिक यात्रा उत्सवाला बुधवारी उत्साहात प्रारंभ झाला. तीन दिवस चालणाऱ्या या उत्सवानिमित्त धार्मिक, सांस्कृतिक व पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शहरासह पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली आहे.

पहाटे बुवासिद्ध देवांच्या पादुकांचा वेदमंत्रांच्या घोषात विधिवत अभिषेक करण्यात आला. त्यानंतर कावडधारी भाविकांची ढोल-ताशे, डीजे व जयघोषात भव्य मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी पारंपरिक झेंडा मिरवणूक व महाआरती पार पडली. रात्री राहिंज बंधू प्रस्तुत जागरण-गोंधळ कार्यक्रमाने भक्तांना मंत्रमुग्ध केले. गुरुवारी श्री श्री १००८ ओंकार गिरीजी स्वामी यांच्या हस्ते महाआरती, महाप्रसाद व आकर्षक आतषबाजीचे आयोजन करण्यात आले. आज (शुक्रवारी) कुस्ती स्पर्धा, महाआरती व विविध धार्मिक कार्यक्रमांनी यात्रेची सांगता होणार आहे.

लहान मुलांसाठी रहाटपाळणे व मनोरंजनाची साधने उपलब्ध करण्यात आली आहेत. यात्रा शांततेत पार पडावी यासाठी पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## श्रीराम साधना आश्रमात गुरुपौर्णिमा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील मुकींदपूर येथील चारी क्रमांक ३ जवळील रामनगर येथील श्रीराम साधना आश्रमात गुरुवर्य महंत स्वामी सुनीलगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व भागवताचार्य साध्वी सुवर्णानंद दिदी चैतन्य यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुपौर्णिमा उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. उत्सवानिमित्त पहाटे वेदमंत्रांच्या जयघोषात प्रभू श्रीराम, सीतामाता, लक्ष्मण व मारुतीराय यांच्या मूर्तींचा जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर ब्रह्मलीन श्री भक्त प्रल्हादगिरी महाराज व ब्रह्मलीन सद्गुरू श्री प्रकाशगिरी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पांजली अर्पण करण्यात आली. व्यासपूजन, गुरुपूजन व संतपूजनाच्या कार्यक्रमांनाही भाविकांनी मोठी उपस्थिती लावली.

स्वामी सुनीलगिरीजी महाराज यांच्यासह उपस्थित संत-महंतांचा सत्कार श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्याही श्रीमंत पिलाजीराजे राजेशिर्के यांचे १३ वे वंशज अमितराजे राजेशिर्के, सौ. पूनम राजेशिर्के व ओम राजेशिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जोहरापूर येथील भजनी मंडळाने सादर केलेल्या भजनांनी वातावरण भक्तिमय झाले. हभप राम महाराज शेळके-गळनिंबकर यांनी गुरू-शिष्य परंपरेवर कीर्तन करत गुरूमहिम्याचे महत्त्व विविध दृष्टांतांतून उलगडून सांगितले. स्वामी सुनीलगिरीजी महाराज यांनी श्रीराम साधना आश्रमाची स्थापना भक्तांच्या कल्याणासाठी व धर्मजागृतीसाठी झाल्याचे सांगितले.

दुपारी विजय शिंगी व राजेंद्र शिंगी परिवारातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. दिवसभर भाविकांनी स्वामी सुनीलगिरीजी महाराज व साध्वी सुवर्णानंद दिदी चैतन्य यांचे दर्शन घेऊन संतपूजन केले. उत्सवाच्या यशस्वीतेसाठी वैभव निकम, पोपटराव निपुंगे, सिताराम निपुंगे, प्रशांत पवार, शुभम सुरवसे, बानकर आप्पा, पवार बंधू व सेवेकरी मंडळींनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी महंत स्वामी सुनीलगिरीजी महाराज यांनी उपस्थित मान्यवर व भाविकांचे आभार मानले.

## पान १ वरुन

### सर्वोच्च न्यायालयात ४ ऑगस्टला अंतिम सुनावणी

या निर्णयाला उद्धव ठाकरे यांच्या गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असून, अंतिम निकालाकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.उद्धव ठाकरे गटातर्फे ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद करताना, सुनावणीला होत असलेल्या विलंबामुळे लोकप्रतिनिधींच्या पक्षांतराची प्रक्रिया सुरूच असून, ही लोकशाहीसाठी धोकादायक बाब असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. पक्ष आणि संसदीय पक्ष हे स्वतंत्र असल्याचा घटनापीठाचा पूर्वीचा निर्णयही त्यांनी न्यायालयासमोर मांडला. तसेच निवडणूक आयोगाने पक्षाच्या घटनेचा पुरेसा विचार न करता निर्णय दिल्याचा दावा केला.जून २०२२ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाविरोधात एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांसह बंड केल्यानंतर राज्यातील राजकीय समीकरणे बदलली. त्यानंतर निर्माण झालेला शिवसेना पक्षावरील आणि 'धनुष्यबाण' चिन्हावरील वाद निवडणूक आयोग व सर्वोच्च न्यायालयात पोहोचला. या प्रकरणाचा अंतिम निकाल महाराष्ट्राच्या राजकारणासाठी महत्त्वाचा मानला जात असून, आता दोन्ही बाजूंच्या अंतिम युक्तिवादानंतर न्यायालयाच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या अर्जांवर ९० दिवसांत निर्णय बंधनकारक!

या निर्णयावर बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, बदलत्या कौटुंबिक रचनेमुळे वृद्ध आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होण्याच्या व त्यांच्यावर अन्याय होण्याच्या घटना चिंताजनक आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आम्ही महसूल प्रशासनाला कडक निर्देश दिले आहेत. ज्येष्ठ नागरिकांचे उर्वरित आयुष्य सुखाचे आणि सन्मानाचे जावे, हाच आमचा मूळ उद्देश आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कामाची नोंद घेतली जाईल. मात्र, कामात कसूर करणाऱ्या किंवा ज्येष्ठ नागरिकांचे अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची तसेच दंडात्मक कारवाई केली जाईल.

### पाकिस्तानच्या गोळीबारात ३७ जणांचा मृत्यू

घोषणांनी रावलकोटसह अनेक भाग दणाणून गेले आहेत. या घोषणांचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. हिंसाचारात मृत्यूमुखी पडलेल्यांमध्ये जॉइंट अवामी क्शन कमिटीचे सदस्य उमर नजीर यांचे बंधू उस्मान नजीर यांचाही समावेश असल्याचे वृत्त आहे. आंदोलनामुळे पाकव्याप्त काश्मीरमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरही परिणाम झाला असून, निवडणुकांमध्ये फेरफार, दडपशाही आणि नागरिक बेपत्ता होण्याचे आरोपही समोर येत आहेत.

### प्रवरेचे पाणी पाहण्यासाठी गेलेला तरुण वाहून गेला!

घटना घडल्याची माहिती मिळताच स्थानिक पोलीस पथकासह संगमनेर नगरपरिषदेचे आपत्ती व्यवस्थापन व रक्षक दल तातडीने गंगामाई घाटावर दाखल झाले आहे. नदीपात्रात तरुण बेपत्ता झाल्याने युद्धपातळीवर शोधमोहीम देखील सुरू करण्यात आली आहे.घटनेचे गांभीर्य ओळखून संगमनेर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष नूरमोहम्मद शेख, मुख्याधिकारी दयानंद गोरे पाणी पुरवठा सभापती मुजिबखान. यांच्यासह स्थानिक नगरसेवक व पदाधिकारी तातडीने घटनास्थळी पोहोचले आहेत. शोधमोहिमेवर प्रत्यक्ष लक्ष ठेवले जात असून स्थानिक पाणबुडे आणि आपत्कालीन यंत्रणेच्या मदतीने तरुणाचा शोध घेतला जात आहे. सध्या नद्यांना आलेला पूर आणि पाण्याचा प्रवाह पाहण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने नदीकाठी गर्दी करत आहेत. मात्र, असाच पाणी पाहण्याचा छंद आणि केलेला निष्काळजीपणा या तरुणाच्या जीवावर बेतला असल्याने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. प्रशासनाने नागरिकांना पुराच्या पाण्यात किंवा नदीपात्राजवळ न जाण्याचे आणि सतर्क राहण्याचे आवाहन देखील केले आहे. प्रवरा नदीत पोहण्यास गेलेला तरूणाची दुर्दैवी घटनेची माहिती कळताच सामाजिक कार्यकर्त्या नीलम खताळ यांनी घटनास्थळी पाहणी करत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.

### भरधाव पिकप पलटली : एकाचा मृत्यू,सहा जखमी

वासुंदे चौकात रस्त्याला मोठे वळण असल्यामुळे नेहमीच अपघात होत असतात. त्यामुळे जवळपास रस्त्यावर मोठे स्पीडब्रेकर टाकण्यात यावेत तसेच चौकात सर्कल निर्माण करण्यात यावे. अशी मागणी पोलीस मित्र अनिल नांगरे यांनी केली आहे.

### बालविवाह पडला महागात.... मुलीच्या आई-वडिलांसह पाच जणांवर गुन्हा

पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार संगमनेर तालुक्यातील साकूर गावात राजा बिरोबा मंगल कार्यालयात हिंदू रितीरिवाजानुसार मोठ्या उत्साहात डीजेच्या तालावर हा विवाह लग्नपत्रिकेत नमूद असल्याप्रमाणे सोमवारी दि.२० एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता हळदी समारंभ व मंगळवारी दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १ ला हा बालविवाह राजा बिरोबा मंगल कार्यालयात संपन्न झाला. हा गंभीर गुन्हा असल्यामुळे ग्रामसेवक रसाळ यांनी मुलीचे सासरे वामन दगडू खेमनर, आई लता वामन खेमनर व नवरा अरुण वामन खेमनर यांच्या सह मुलीच्या आई वडिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहेत.

१२ दिवस उशिराने गुन्हा दाखल - बालविवाह ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे.या विवाहाला प्रतिबंध करण्यासाठी शासनाने कडक कायदा केला आहे. परंतू या सिस्टममधील काही भ्रष्ट अधिकारीच कायदा पायंदळी घालत असल्याचे या केस मधून निदर्शनास आले आहे. १७ जुलै रोजी दाखल केलेली तक्रार थेट २९ जुलै रोजी घारगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली. यावेळी एका राजकीय पदाधिकाऱ्यानी थेट बालविवाह समितीवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला असल्याची चर्चा देखील मोठ्या प्रमाणात सुरु आहे. हा पदाधिकारी थेट अहिल्यानगर येथे जाऊन समिती च्या सदस्यांवर दबाव टाकत होता. परंतू तक्रारदाराच्या सतर्कतेने हा गुन्हा अखेर काल रात्री उशिराने दाखल करण्यात आला.

पोक्सो दाखल करण्याची मागणी - राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने हस्तक्षेप केल्याने या विवाहात आरोपी असलेले मंगल कार्यालय चालक, भटजी, विवाह जुळवून देणारा, लग्न व हळदीच्या कार्यक्रमातील अनधिकृत कर्णक्रकश डीजे, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला नाही. हा विवाह एप्रिल महिन्यात लावण्यात आला तीन महिने ही अल्पवयीन मुलगी या मुलाच्या घरात राहिली. त्यामुळे पोस्को कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे. परंतू या राजकीय पदाधिकाऱ्यांनी केलेला आटापिटा व राजकीय पक्षाच्या नावाखाली गुन्हा दाखल करण्यासाठी दबाव आणल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरु आहे.

### 'मनुस्मृती'वरून संसदेत गदारोळ

असा इशाराही दिला. दरम्यान, केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी सादर केलेले सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयक दोन्ही सभागृहांत मंजूर झाले असून, पेपरफुटी व गैरप्रकारांवर अधिक कठोर कारवाईसाठी त्यातील दंडात्मक तरतुदी अधिक कडक करण्यात आल्या आहेत.

# दोन महिने उलटले, तरी तिसरी-चौथीची पाठ्यपुस्तके अद्याप अपुरीच

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**वैजापूर : दिपक बरकसे**

तालुक्यातील अनेक ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत दिली जाणारी पाठ्यपुस्तके अद्याप पूर्णपणे वितरित न झाल्याच्या तक्रारी वाढत आहेत. शाळा सुरू होऊन दोन महिन्यांहून अधिक कालावधी लोटला असतानाही अनेक विद्यार्थ्यांच्या हातात सर्व विषयांची पुस्तके पोहोचलेली नाहीत. त्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असून पालकांमध्येही नाराजी व्यक्त केली जात आहे.



दरम्यान, तालुक्यातील पानवी खंडाळा येथील श्रेयस बावचे या चिमुकल्या विद्यार्थ्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये श्रेयस अत्यंत निरागसपणे सांगतो की, त्याला आतापर्यंत फक्त दोनच पुस्तके मिळाली आहेत. गेल्या दोन महिन्यांपासून तो त्याच दोन पुस्तकांच्या आधारे शिक्षण घेत आहे. इतर विषयांची पुस्तके अद्याप मिळालेली नसल्याने त्या विषयांचा अभ्यासच होत नसल्याचे त्याने सांगितले. एवढेच नव्हे, तर आपल्या वर्गातील इतर काही विद्यार्थ्यांनाही पुस्तके मिळालेली नसल्याचा दावा त्याने केला आहे. या चिमुकल्याची व्यथा ऐकून अनेकांनी शिक्षण व्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली आहे.

शासनाकडून गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत शैक्षणिक सुविधा पोहोचविण्याचे दावे सातत्याने केले जातात. मात्र, प्रत्यक्षात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत वेळेत पाठ्यपुस्तकेच पोहोचत नसल्याचे चित्र समोर येत आहे. पुस्तकांशिवाय विद्यार्थ्यांचा अभ्यास अपूर्ण राहत असून शिक्षकांनाही अध्यापन करताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. वेळेत पुस्तके न मिळाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून त्यांच्या अभ्यासाचा वेगही मंदावला आहे.

याबाबत गटशिक्षाधिकारी हेमंत ऊशिर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, ''विद्यार्थ्यांना पुस्तके मिळाली नाहीत, असे होणे योग्य नाही. तालुक्यात बहुतांश ठिकाणी पुस्तकांचे वितरण पूर्ण झाले आहे. केंद्रीय स्तरावरून होणाऱ्या पुरवठ्यामध्ये काही प्रमाणात कमी-जास्त होण्याची शक्यता असते. या प्रकरणाची मी तातडीने चौकशी करतो. ज्या विद्यार्थ्यांना पुस्तके मिळालेली नसतील, त्यांच्यापर्यंत ती लवकरात लवकर पोहोचविण्याची कार्यवाही करण्यात येईल.''

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी शिक्षण विभागाने तातडीने उर्वरित पाठ्यपुस्तकांचे वितरण पूर्ण करावे, अशी मागणी पालक आणि नागरिकांकडून केली जात आहे.

## कोळगाव शिवारात दरोडाच्या तयारीतील ६ जण जेरबंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव शिवारात दरोडेच्या तयारीत असलेल्या सहा जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने मोठ्या शिताफिने जेरबंद केले. अटक केलेल्या आरोपींकडून १ लाख २० हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश भोळे, पोलीस अंमलदार भाऊसाहेब काळे, राहुल डोके, किशोर शिरसाट, बाळासाहेब खेडकर, सुनील मालवणकर, अमोल कोतकर, योगेश कर्डिले, अरुण मोरे, ज्योती शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली. श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर फाटा ते विसापूर जाणाऱ्या रोडवर पोलीस पथक जात असताना काही इसम तेथून पळून जाऊ लागले. तेव्हा पोलीस पथकाने पाठलाग करून त्या सहा जणांना ताब्यात घेतले तर चार जण पळून गेले. ज्यावेद घड्याळ चव्हाण (वय ३५), कान्हा घड्याळ चव्हाण (वय २०), सांगड्या जबर्या काळे (वय ४८ सर्व रा. सुरेगाव, ता. श्रीगोंदा), संदेश उर्फ दवल्या संजय भोसले (वय २२, रा. वाघुंडे, ता. पारनेर), रिबीन घड्याळ चव्हाण (वय ५५ ,रा. सुरेगाव, ता. श्रीगोंदा) अशी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहे. अक्षय उंबऱ्या काळे, तेजस सगळ्या काळे, शंभू कुंजीलाल चव्हाण, शिवाजी कुंजीलाल चव्हाण अशी फरार झालेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींकडून कोयता, लोखंडी पाना, मिरचीची पूड ,सुरा, बनावट दागिने, गोल शिक्के, मोबाईल, दोन मोटरसायकल असा एकूण १ लाख २० हजार ५०० रुपयांच्या मुद्देमाल हस्तगत केला आहे. या आरोपींकडून इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## व्यवसाय म्हणून शेळीपालन केल्यास शाश्वत उत्पादन शक्य : डॉ. दिनकर कांबळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी |** शेतकऱ्यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठामार्फत आयोजित प्रशिक्षणाचा लाभ घेऊन शेळीपालन व्यवसाय आधुनिक व शास्त्रोक्त पद्धतीने केल्यास अधिक उत्पादनासह चांगला आर्थिक नफा मिळविता येतो. व्यवसाय म्हणून शेळीपालन स्वीकारल्यास शाश्वत उत्पादन शक्य असून तो शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा विश्वासार्ह पर्याय ठरू शकतो, असे प्रतिपादन पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागप्रमुख डॉ. दिनकर कांबळे यांनी केले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषद (खउअठ) अंतर्गत कार्यरत शेळी सुधार प्रकल्पाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे व संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली शेळीपालकांना आधुनिक तंत्रज्ञान, व्यावसायिक शेळीपालन व नव्या संशोधनाची माहिती मिळावी या उद्देशाने नियमित प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रमास प्रकल्पाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रशिक्षण समन्वयक डॉ. विष्णू नरवडे, डॉ. दिलीप देवकर, डॉ. समीर ढगे, डॉ. उल्हास गायकवाड आणि डॉ. अमर लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.तीन दिवसीय प्रशिक्षणामध्ये शास्त्रज्ञांनी शास्त्रोक्त पैदास, आहार व आरोग्य व्यवस्थापन, पशुधनासाठी चारा नियोजन, शेळीच्या दुधाचे गुणधर्म व मूल्यवर्धन आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच वांबोरी येथील किसान मित्र फाउंडेशनचे दिगंबर अडसुरे व अविनाश क्षीरसागर यांनी शासनाच्या विविध शेळीपालन योजनांची माहिती देत प्रकल्प आराखडा तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी सहभागी प्रशिक्षणार्थींना पुस्तिका व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विष्णू नरवडे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार डॉ. उल्हास गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संदीप पवार, रमेश कलापुरे, ज्ञानेश्वर डांगे, गौरव घोलप व अजय गुलदगड यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रशिक्षणात वांबोरी येथील किसान मित्र फाउंडेशनच्या ४४ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला.

## वनकुटेच्या रखडलेल्या घर नुकसान भरपाईचा मार्ग मोकळा : आ. दातेंच्या प्रयत्नांना यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** एप्रिल २०२३ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे वनकुटे ता. पारनेर येथील अनेक घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. मात्र तब्बल तीन वर्षे उलटूनही संबंधित नुकसानग्रस्तांना शासनाकडून अनुदान मिळाले नव्हते. या गंभीर प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करत पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते यांनी हा विषय राज्य शासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. दरम्यान मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंद आबा पाटील यांनी संबंधित विभागाला आवश्यक ती कार्यवाही करून वनकुटे येथील नुकसानग्रस्तांना तातडीने अनुदान मिळण्याबाबत प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता वनकुटे येथील नुकसानग्रस्तांना भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

> आ. काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर एप्रिल २०२३ मधील अवकाळी पावसाने बाधित घरांच्या अनुदानाचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी मंत्री ना. मकरंद आबा पाटील यांनी प्रशासनाला कार्यवाहीचे स्पष्ट निर्देश दिले. वनकुटे ग्रामस्थांच्यावतीने आ. काशिनाथ दाते सरांचे मनःपूर्वक आभार. वनकुटे ग्रामस्थ सदैव आपले ऋणी राहतील,''
>
> **सौ.सुमन रांधवन**
> **(सरपंच वनकुटे)**



वनकुटे गावच्या सरपंच व ग्रामस्थांच्या माध्यमातून वारंवार होत असलेल्या मागणीचा विचार करून पारनेर व कान्हूर मंडळातील नुकसानग्रस्तांच्या भरपाईसंदर्भात आयोजित बैठकीत आ. दाते सरांनी मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंद आबा पाटील यांच्यासमोर वनकुटे गावातील प्रलंबित अनुदानाचा हा मुद्दा ठामपणे मांडलेला होता. त्यानंतर मागील महिन्यात वनकुटे ग्रामपंचायतीने नुकसानभरपाई मिळवून देण्याबाबतचे लेखी निवेदन आ. दाते सरांकडे सादर केल्यानंतरही त्यांनी ह्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी संबंधित ग्रामस्थांना तातडीने न्याय देण्याची मागणी केली. यापूर्वी अवकाळी नुकसानीची पाहणी करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी वनकुटे गावाला भेट देत नुकसानग्रस्तांना मदतीचे आश्वासन दिले होते. मात्र त्यानंतरही अनुदान न मिळाल्याची बाब आ. दाते सरांनी वारंवार मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देत शासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली.

## जलजीवन मिशन मधील भ्रष्टाचार लोकसभेत उपस्थित करा : माळवदे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

> जलजीवन मिशन मधील घोटाळ्याची व्याप्ती अहिल्यानगर पुरती मर्यादित नसून याची व्याप्ती खुप मोठी आहे.प्रशासन व ठेकेदार यांची भूमिका संशयास्पद आहे तर सरकार देखील यास जबाबदार आहे. कमिशनखोरीमुळे कामाचा दर्जा खालवला आहे. याविरोधात लवकरच जनआंदोलन उभारणार. याप्रकरणी ठोस कारवाई होइपर्यंत **मागे हटणार नाही. - संभाजी माळवदे,**
> **महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी**

**नेवासा :** राज्यभरातील जलजीवन मिशन कामातील भ्रष्टाचाराबाबत लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करावा अशी मागणी कॉंग्रेसचे संभाजी माळवदे यांनी शिर्डी लोकसभा मतदार संघांचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वे केली. राज्यभरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा अंतर्गत हजारो कोटींची पाणीपुरवठ्याची कामे सुरु आहे. परंतु जलजीवन मिशनची हीं कामे करण्यास झालेला विलंब, कामाचा निकृष्ट दर्जा, प्रशा५सन व ठेकेदार यांनी केलेला भ्रष्टाचार, अनियमितता व जनतेने केलेल्या अनेक तक्रारी नंतर या कामाची समिती मार्फत झालेली चौकशी तसेच अहिल्यानगर मधील दहापेक्षा जास्त अभियंत्यावर झालेली निलंबणाची कारवाई यामुळे जलजीवन मिशन मधील भ्रष्टाचार जनतेसमोर उघड झाला. मजीप्राच्या विरोधात कॉंग्रेसचे माळवदे यांनी उच्च न्यायालयात याचिका देखील दाखल केली. मजीप्रामधील हा भ्रष्टाचार फक्त अहिल्यानगर पुरता मर्यादित नसल्याने याविषयी लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करावा यासाठी माळवदे यांनी शिर्डी लोकसभेचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांची भेट घेऊन याविषयी निवेदन दिले. निवेदनामध्ये जलजीवन मिशन मधील योजनाना तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा व अपूर्ण कामे तातडीने सुरु करण्यात यावी,निकृष्ट कामाची राज्य गुणवत्ता विभागा मार्फत चौकशी करण्यात यावी, योजनेतील भ्रष्ट ठेकेदारावर दंडाची कारवाई करावी.

## समतानगरात युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**गंगापूर** शहरातील समतानगर परिसरात २१ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी रात्री (दि. २९ ते ३० जुलै दरम्यान) उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत युवकाचे नाव भगवान सुभाष निकम (वय २१, रा. समतानगर परिसर, जुना मांजरी रोड, गंगापूर) असे आहे. भगवान याने नवीन घरातील हुकाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे सांगण्यात आले. गुरुवारी सकाळी वडील आणि भावाला तो फासावर लटकलेल्या अवस्थेत दिसला. त्यांनी तातडीने त्याला खाली उतरवून गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. पवन मुंदडा यांनी तपासून त्याला मृत घोषित केले. दरम्यान, या प्रकरणात नातेवाईकांनी गंभीर आरोप करत, भगवानला मारहाण करण्यात आल्यामुळेच त्याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याचा दावा केला आहे. तसेच त्याच्या शरीरावर मारहाणीच्या खुणा असल्याचीही चर्चा सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच गंगापूर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून, संबंधित प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल गणेश जाधव करीत असून मृत भगवान निकम यांच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ आणि एक बहीण असा परिवार आहे.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**
**शुक्रवार दि . ३१ जून २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४६<br>१२८<br>११९ | १-३ | १३४<br>४९०<br>६७० | जोड<br>१९-०३-४७-८६-३२ |

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १७९<br>२७८<br>३७७ | ७-५ | १४०<br>२३०<br>६९० | जोड<br>७६-१५-३४-०८-५५ |

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२९<br>१५८<br>११० | २-६ | १५०<br>१६९<br>११४ | जोड<br>२३-०६-७५-८९-६५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६



Chang in name
I HAVE CHANGE MY OLD NAME Rukhsana HASAN SHAIKH (School Leaving certificate) (Before Name) TO NAME AS RUKSANA ASIF INAMDAR AADHAR NO 677390394031

Chang in name
My old name is Soni Sachin Ashokchand my new name is Soni Sachin Ashok both the person are same reference adhar card number 557088504825

CHANGE OF NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME SHAUKAT NOORMOHAMAD MANSURI (NAME AS PER OLD PASSPORT NO.K5650599 TO NEW NAME AS SHAUKAT NURMOHMMAD MANSURIVIDE AADHAR NO.2205 0397 7483

CHANGE OF NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME JARINA NOORMAHAMMAD MANSURI (NAME AS PER OLD PASSPORT NO.K5651322) TO NEW NAME AS JARINA NURMAHMAD MANSURI VIDE AADHAR NO.2133 6258 2345

CHANGE OF NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME ABUJAR AHMED SHAH (NAME AS PER SCHOOL DOCUMENTS ) TO NEW NAME AS ABUZAR AHEMAD SHAH VIDE AADHAR NO.8979 5105 1980


## निधन वार्ता

### कमलबाई सुडके



**नेवासा :** तालुक्यातील प्रवरासंगम येथील जुन्या पिढीतील श्रीमती कमलबाई चंद्रभान सुडके (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. कमलबाई चंद्रभान सुडके यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कर सल्लागार राजेंद्र सुडके, प्रगतशील शेतकरी शिवाजी सुडके तसेच भीमाताई पवार यांच्या त्या मातोश्री होत्या.

### बापूसाहेब वाबळे



**माळवाडगांव :** श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर येथील जुन्या पिढीतील बापूसाहेब खंडेराव वाबळे (वय-९५) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले असून त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले व ४ मुली असून माळवाडगांव येथील जेष्ठ पत्रकार विठ्ठलराव आसने यांचे ते सासरे होत.


**शुभ लाभ**

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 9 | | | | |

दखल

## घरमालकांनी भाडेकरुंची माहिती स्थानिक पोलीस स्टेशनला सादर करा - अपर जिल्हादंडाधिकाऱ्यांचे आदेश जारी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ खाली प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार पुणे ग्रामीण जिल्हयातील घरमालकांनी त्यांच्या घरात भाडेकरु ठेवताना संबंधित भाडेकरुंची माहिती स्थानिक पोलीस स्टेशन यांचेकडे सादर करण्याबाबतचे अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी आदेश जारी केले आहे. पोलीस स्टेशनला माहिती देतांना भाडेकरुचे संपूर्ण नाव, सद्याचा पत्ता, मूळ पत्ता, दोन छायाचित्रे, त्यांना ओळखणा-या व्यक्तींचे नाव व पत्ता, घरभाडे करारनामा, ओळखपत्र आदी कागदपत्रे सादर करावी. माहिती स्थानिक पोलीस स्टेशनला न दिल्यास भारतीय न्याय संहितेचे कलम २२३ प्रगाणे दंडनीय कारवाईस पात्र राहतील. स्थानिक पोलीस स्टेशनने याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी

## डुबेवाडी जिल्हा परिषद शाळेत दिंडी सोहळा उत्साहात साजरा



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**यवत :** आषाढी एकादशीचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डुबेवाडी येथे विद्यार्थ्यांचा पारंपारिक दिंडी सोहळा अत्यंत भक्तिमय आणि आनंदमय वातावरणात संपन्न झाला. विठ्ठल... विठ्ठल...जय हरी विठ्ठल ! या नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या सोहळ्यास या प्रसंगी दौंड पंचायत समितीचे सभापती सुखदेव चोरमले यांच्यासह श्रीकृष्ण डुबे, राजा डुबे, योगेश डुबे, देविदास डुबे, किसन डुबे, संतोष कोळपे, शिवराम डुबे, संजय डुबे, सागर डुबे, कोंडीबा डुबे, मुख्याध्यापक सर्व शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, गावातील तरुण, विद्यार्थी, माता-भगिनी यांसह ग्रामस्थ तसेच पंचक्रोशीतील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले आणि सोहळ्याची शोभा वाढवली. या सुंदर व भक्तिमय कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शालेय समिती, पालक, ग्रामस्थ आणि सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेचा लाभ घ्या

# नवउद्योजकांसाठी स्वयंरोजगाराच्या संधी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत सुशिक्षित बेरोजगार, कारागीर, संस्था व बचत गटांनी लाभ घेऊन स्वयंरोजगारासह रोजगार निर्मिती करावी, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी रमेश सुरूंग यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत उत्पादन उद्योगांसाठी १ लाख ते १०० लाख रुपयांपर्यंत, तर सेवा उद्योग व कृषीपूरक सेवा उद्योगांसाठी १ लाख ते ५० लाख रुपयांपर्यंत प्रकल्प कर्ज उपलब्ध करून दिले जाते. सेवा उद्योगासाठी २० लाख रुपयांपर्यंत, तर उत्पादन उद्योगासाठी ५० लाख रुपयांपर्यंत मार्जिन मनी अनुदान देण्यात येते. उर्वरित प्रकल्प रक्कम कर्ज स्वरूपात परतफेड करावयाची असते. तसेच नवीन सेवा उद्योग, उत्पादन उद्योग आणि ई-रिक्षा तसेच ई-ट्रान्स्पोर्ट व्यवसायालाही या योजनेत प्रोत्साहन देण्यात येत आहे. योजनेसाठी अर्जदार हा स्थानिक रहिवासी असावा व त्याचे कोणतेही स्थायी उत्पन्न नसावे. अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असावे. शासनाच्या अन्य कोणत्याही अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा. केवळ नवीन उद्योजक, कारागीर, संस्था व बचत गट या योजनेस पात्र राहतील. १० लाख रुपयांवरील उत्पादन उद्योग प्रकल्प तसेच ५ लाख रुपयांवरील सेवा व कृषीपूरक उद्योग प्रकल्पांसाठी अर्जदार किमान आठवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. एका कुटुंबातील (पती-पत्नी) केवळ एका व्यक्तीस या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

अर्जासोबत आधार कार्ड, शैक्षणिक प्रमाणपत्र अथवा अधिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, ग्रामसेवकांचा लोकसंख्येचा दाखला, प्रकल्प अहवाल, विहित नमुन्यातील इंग्रजीतील अंडरटेकिंग, पॅन कार्ड, गुणपत्रिका व छायाचित्र जोडणे आवश्यक आहे. इच्छुकांनी maha-cmegp.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करताना KVIB या एजन्सीची निवड करावी. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका पर्यवेक्षक उद्योग किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधावा. कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीमार्फत संपर्क करू नये. अशा व्यक्तींमार्फत फसवणूक झाल्यास कार्यालय जबाबदार राहणार नसल्याचेही श्री. सुरूंग यांनी स्पष्ट केले आहे.

## ड्रोन कॅमेराद्वारे चित्रीकरणास प्रतिबंध आदेश जारी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे ग्रामीण जिल्ह्यात कोणत्याही खाजगी व्यक्ती, कार्यक्रम व्यवस्थापन (इव्हेंट मॅनेजमेंट) व छायाचित्रण करणाऱ्या व्यावसायिकांनी ड्रोन कॅमेराचा वापर करताना त्याची पूर्व माहिती ७ दिवस आधी संबंधित पोलीस ठाण्यास कळवून संबंधीत प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांची रितसर परवानगी घेणे बंधनकारक राहील, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी जारी केले आहेत.

जिल्ह्यात महत्त्वाची धार्मिक स्थळे, धरणे, केंद्रीय संस्था असून दहशतवादी कारवायांमध्ये ड्रोन कॅमेराद्वारे टेहळणी होवून त्याचा अतिरेकी कारवायांमध्ये उपयोग केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दौंड, बारामती, शिरुर तालुक्याच्या परिसरामध्ये रात्रीच्या वेळी ड्रोन उडत असल्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत असून नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाळू माफिया देखील टेहळणीसाठी ड्रोनचा वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. ड्रोनच्या माध्यमातून टेहाळणी करुन इतर प्रकारच्या चोऱ्याही होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे हे प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.

जिल्ह्यात ड्रोन, रिमोट-नियंत्रित मायक्रोलाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर, पॅरा मोटर्स, हँग ग्लायडर, हॉट एअर बलून आणि तत्सम सर्व हवेत उडणाऱ्या वस्तूंच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. कोणतीही खाजगी व्यक्ती, इव्हेंट मॅनेजमेंट व छायाचित्रण करणारे व्यावसायिकांनी ड्रोन कॅमेराचा वापर करताना त्याची पूर्व माहिती ७ दिवस अगोदर संबंधित पोलीस ठाण्याला देवून परवानगी घेणे बंधनकारक आहे.

आदेशाचा भंग करुन पोलीसांच्या परवानी शिवाय कोणताही व्यक्ती ड्रोन कॅमेरादवारे चित्रीकरण करताना आढळून आल्यास अशी व्यक्ती भारतीय न्याय संहितेचे कलम २३३ प्रमाणे पात्र राहतील, असेही अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी जारी केलेल्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुर्नक्षण कार्यक्रमास मुदतवाढ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** भारत निवडणूक आयोगाने मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision) कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले असून, राज्यातील काही भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे पुनरिक्षणाच्या कामावर झालेल्या परिणामाची दखल घेत ही मुदतवाढ देण्यात आली आहे. कोकण, मुंबई तसेच राज्यातील काही भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे विशेष सखोल पुनरिक्षणाच्या कामकाजावर परिणाम झाला होता. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमातील मुदत वाढविण्याची विनंती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत भारत निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. त्यानुसार आयोगाने सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. सुधारित वेळापत्रकानुसार मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याकडून गृहभेटींचा कालावधी ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ असा राहणार आहे. मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचनेचे कामही ८ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. मतदार याद्यांचा प्रारूप मसुदा १७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

त्यानंतर १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार असून, त्यावरील सुनावणी व निकाली काढण्याची प्रक्रिया १७ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पूर्ण केली जाईल. अंतिम मतदार यादी १९ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.मतदार याद्यांमधील काही मतदारांच्या पत्त्यांची माहिती अपुरी किंवा संक्षिप्त स्वरूपात नोंदविण्यात आलेली होती.उदाहरणार्थ, एखाद्या मतदाराचा पत्ता केवळ अमुक व्यक्ती, कोथरूड, पुणे एवढाच नमूद असल्यास संबंधित मतदाराचा शोध घेणे मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांसाठी (BLO) वेळखाऊ आणि आव्हानात्मक ठरते. त्यामुळे अशा मतदारांनी स्वतःहून आपल्या क्षेत्रातील इङज यांच्याशी संपर्क साधल्यास नोंदणी अर्ज (एर्पीशीरींळेप ञ्रीा) वाटप व पडताळणीची प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण होण्यास मदत होईल, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

नागरिकांना त्यांच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे (BLO) नाव व संपर्क क्रमांक जाणून घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या अधिकृत संकेतस्थळावरील माहितीचा उपयोग करता येईल. संबंधित माहिती ग्पिश.सेीं. ळप या संकेतस्थळावर उपलब्ध असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असेही जिल्हाधिकारी डुडी यांनी नमूद केले आहे.

## इंडिया स्किल्स स्पर्धा २०२६-२७ ऑनलाइन नोंदणी सुरू

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे:** भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय आणि नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित इंडिया स्किल्स स्पर्धा २०२६-२७ साठी ऑनलाइन नोंदणी सुरू झाली असून, पात्र युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे यांनी केले आहे.

या स्पर्धेत जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर निवड प्रक्रिया राबविण्यात येणार असून, राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट स्पर्धकांना थेीश्रव डज्ञळश्रश्री स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेसाठी विविध कौशल्य क्षेत्रांनुसार निर्धारित वयोमर्यादा लागू राहणार आहे. शासकीय व खासगी आयटीआय, तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालये, एमएसएमई, कौशल्य प्रशिक्षण संस्था, विद्यापीठे तसेच इतर शैक्षणिक संस्थांमधील पात्र उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in/ या पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करावी.अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१, रास्ता पेठ, पुणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त सु. रा. वराडे यांनी केले आहे.

## पीआय देशमुख गेले आता तासगावकर आले

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**दौंड :** यवत पोलिस ठाण्याचे पुर्वीचे पोलिस निरीक्षक देशमुख गेले आता त्यांच्या जागी पोलिस निरीक्षक म्हणून संतोष तासगावकर आले आहेत. यवत पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्याची रेलचेल सुरु असल्याचे चित्र आहे.

नुकतेच आलेले पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांनी आल्या आल्या आपला दबदबा निर्माण करुन आरोपी व अवैध धंद्याची झाडाझडती सुरू करावी अशी मागणी यवत परिसरातील नागरिकांनी केली आहे. यवत परिसरातील अवैध धंद्यांना उत आला असुन यांच्यावर जबर धाक निर्माण करून अवैध धंदे बंद करावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## दूध भेसळ प्रकरणातील १३ फरार आरोपींना तात्काळ अटक करा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**वळती/आंबेगाव :** तालुक्यात गाजत असलेल्या बहुचर्चित दूध भेसळ प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अद्याप फरार असलेल्या १३ आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी तसेच भेसळयुक्त दूध स्वीकारून त्यावर प्रक्रिया करणाऱ्या संबंधित दूध प्रकल्पांची सखोल चौकशी करून त्यांच्यावरही कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांची भेट घेऊन केली.

या संदर्भात देवदत्त निकम यांनी आयुक्त मुंडे यांना सविस्तर निवेदन सादर केले. दूध भेसळ प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता केवळ प्रत्यक्ष भेसळ करणाऱ्यांपुरती चौकशी मर्यादित न ठेवता संपूर्ण साखळीची तपासणी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. भेसळयुक्त दूध तयार करणारे, त्याची वाहतूक करणारे तसेच ते स्वीकारून प्रक्रिया करणारे संबंधित दूध प्रकल्प या सर्वांची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. यावेळी निकम यांनी सांगितले की, दूध भेसळ हा केवळ आर्थिक फायद्यासाठी केलेला गुन्हा नसून तो सर्वसामान्य नागरिकांच्या, विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांच्या आरोग्याशी थेट संबंधित असलेला गंभीर अपराध आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांमुळे नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण होत असून अन्नसुरक्षेच्या व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. प्रकरणातील १३ आरोपी अद्याप फरार असल्याबाबत चिंता व्यक्त करताना त्यांनी संबंधित यंत्रणांनी विशेष पथके तयार करून त्यांचा तातडीने शोध घ्यावा व अटक करावी, अशी मागणी केली. तसेच या संपूर्ण प्रकरणात कोणत्याही दोषी व्यक्तीला किंवा संस्थेला अभय न देता निष्पक्ष, पारदर्शक आणि कठोर कारवाई करण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. अन्न व औषध प्रशासन विभागाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषींविरुद्ध कठोर पावले उचलावीत, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारच्या भेसळीच्या घटनांना आळा बसेल, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली. या भेटीदरम्यान राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे आंबेगाव तालुकाध्यक्ष विशाल वाबळे, शंकरराव टेमगिरे, मंगेश वाघ, विशाल भोर उपस्थित होते.

## पुरंदरच्या दक्षिण भागात साजरा झाला आखाडी बेंदुर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** सर्जा राजाच्या कष्टाने सकल मानव जातीला तोंडचा घास मिळतो व तो पिढ्यान पिढ्या अबाधित आहे त्या सर्जा राजा प्रति कृतज्ञता म्हणून व्यक्त करण्याचा आजचा दिवस म्हणजे आखाडी बेंदुर...पुरंदर तालुक्यातील काही गावातून आज आषाढ महिन्यातील बैलपोळा म्हणजेच बेंदूर सण आषाढ शुद्ध त्रयोदशीला ( सोमवारी ) मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सकाळीं बैलांना न्हाउमाखु घालून सायंकाळीं शेंदूर, बेगड, झूल, घुंगुर माळा, फुगे, विविध रंग , शेंब्या आदींनी सजवण्यात आले. गावातून सवाद्य मिरवणूक काढून ग्राम प्रदक्षिणा घालण्यात आली. घरच्या मालकिणींनी पुरण पोळीचा नैवेद्य भरवून बैलांना औक्षण केले. पुरंदर तालुक्यातील हरगुडे गावात हा उत्सव मोठया आनंदाने साजरा करण्यात आला.यंदा पावसाने काहीशी समाधानकारक कृपा केल्याने बळीराजा आनंदात आहे. त्यामुळे मोठ्या हौसेने आजचा सण साजरा करण्यात येत असल्याचे प्रगतशील शेतकरी मनोज ताकवले यांनी सांगितले. यांत्रिकीकरणाने बैलांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असुन अन्य पशुधन देखील कमी होत आहे असे ताकवले यांनी सांगितले मात्र आहे त्या गुराढोरांचे संगोपन करून ग्रामीण भागात बैलांचा हा बेंदुर आनंदाने साजरा होत असल्याचे मनोज ताकवले यांनी सांगितले..सध्या दिवसेंदिवस पशुधन कमी होत असून आधुनिकते कडे म्हणजेच ट्रॅक्टरद्वारे शेती करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे या पार्श्वभूमीवर आज बैलांबरोबरच ट्रॅक्टर देखील मिरवणुकीत सहभागी करण्यात आले होते. आज दिवसभर पावसाची रिमझिम असल्यामुळे बळीराजा सुखावला असुन मोठ्या उत्साहात हा सण साजरा झाला



# माळीणचा महाभयंकर थरार अजूनही ताजा

## बारा वर्षांनंतरही जखमा कायम



नवनाथ फलके
डिंभे, ता. आंबेगाव

३० जुलै २०१४ ची ती काळरात्र आजही माळीण ग्रामस्थांच्या मनातून पुसली गेलेली नाही. रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे डोंगराच्या भेगांमध्ये पाणी साचले आणि पहाटेच्या सुमारास संपूर्ण डोंगरकडा माळीण गावावर कोसळला. प्रचंड आवाज, चिखलाचा वेगवान लोंढा आणि काही क्षणांत संपूर्ण गाव मातीखाली गाडले गेले. या भीषण दुर्घटनेत ४४ कुटुंबांतील १५१ जणांचा मृत्यू झाला. बारा वर्षांनंतरही त्या दिवसाच्या आठवणी ग्रामस्थांच्या डोळ्यांत अश्रू आणतात.दुर्घटनेनंतर शासनाने मृतांच्या वारसांना आर्थिक मदत दिली. विविध सामाजिक संस्थांनीही मदतीचा हात पुढे केला. अवघ्या अडीच वर्षांत कायमस्वरूपी पुनर्वसन पूर्ण करून नव्या माळीणची उभारणी करण्यात आली. ६८ घरांचे सुबक गाव, रस्ते, पाणीपुरवठा, वीज, शाळा, अंगणवाडी यांसह सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. आज बहुतांश ग्रामस्थ शेती, पशुपालन व इतर व्यवसायातून आपले जीवन उभे करत आहेत. काहींनी वाढत्या गरजांनुसार घरांचाही विस्तार केला आहे.मात्र चौकट माळीण, इर्शाळवाडीसारख्या दरड दुर्घटना घडत असल्याने माळीणकरांच्या जुन्या जखमा पुन्हा उघड्या होतात. अशा घटना टाळण्यासाठी धोकादायक गावांचे वेळेत पुनर्वसन करण्याची गरज असल्याचे ग्रामस्थांचे मत आहे. माळीण पुनर्वसन हे देशातील आदर्श आणि अल्पावधीत पूर्ण झालेल्या पुनर्वसन प्रकल्पांपैकी एक मानले जाते. मात्र नव्या गावातील काही प्रलंबित प्रश्नही लवकरच मार्गी लावले जातील, असे पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी सांगितले.दुर्घटनेच्या स्मृतिदिनी जुन्या माळीण येथे १५१ मृतांना अभिवादन करण्यात आले. यावेळी पंचायत समितीच्या उपसभापती ज्योती पारधी, जिल्हा परिषद सदस्य शीला लोहकरे, प्रकाश घोलप, नंदकुमार सोनावले, संजय गवारी, निलेश टेमकर, तहसीलदार राहुल सारंग, गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पवार तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुहास झांजरे यांनी केले. यावेळी विवेक वळसे पाटील यांनी माळीण पुनर्वसनाच्या आठवणींना उजाळा देत नव्या गावासाठी स्वतंत्र गावठाण व ग्रामपंचायत उभारणीचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. जुन्या माळीण येथील हनुमान मंदिरासमोरील सभामंडप, पाणीपुरवठा योजना व इतर विकासकामेही पूर्ण केली जातील, असे त्यांनी सांगितले.

### पर्यटनस्थळ म्हणूनही माळीणची नवी ओळख

**आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरण, आहुपेचे उंच कडे, भीमाशंकरचा जंगल परिसर आणि पाटण खोऱ्याच्या निसर्गसौंदर्यामुळे हा भाग पर्यटकांचे आकर्षण ठरला आहे. जुन्या माळीणचे दुर्घटनास्थळ आणि नव्याने उभारलेले पुनर्वसित गाव पाहण्यासाठी दरवर्षी अनेक पर्यटक येथे येतात. दुःखद इतिहासाची साक्ष देणारे माळीण आज संवेदनशील पर्यटनस्थळ म्हणूनही ओळखले जाते.**

### माळीणची मुले गिरवत आहेत 'माळीण'चा धडा

**माळीण दुर्घटना ज्या गावात घडली, त्याच गावातील नव्या जिल्हा परिषद शाळेत आज विद्यार्थी 'माळीण'चा धडा शिकत आहेत. पावसावरील कविता आणि गाणी म्हणत शिक्षण घेणाऱ्या या मुलांच्या मनात मात्र त्या काळ्या दिवसाची भीती आजही कायम आहे. नव्या माळीणमधील इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या शाळेत माळीण, अडिवरे, पंचाळे, वचपे आणि आमडे येथील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दुर्घटनेच्या वेळी लहान असलेली अनेक मुले आता उच्च शिक्षण घेत असून, नव्या पिढीला आपल्या गावाच्या इतिहासाची माहिती या धड्यातून मिळत आहे.**

### आदर्श पुनर्वसनाची देशभरात दखल

**माळीण दुर्घटनेनंतर अवघ्या अडीच वर्षांत ६८ घरांचे नवे पुनर्वसित गाव उभारण्यात आले. रस्ते, वीज, पाणीपुरवठा, शाळा, अंगणवाडी आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे माळीणचे पुनर्वसन हे देशातील आदर्श आणि कमी कालावधीत पूर्ण झालेल्या पुनर्वसन प्रकल्पांपैकी एक मानले जाते.**


**भिमनगर को. ऑप. हौसिंग सोसा. लि.बारामती जि. पुणे या संस्थेची जाहीर नोटीस**

आमच्या संस्थेमधील सभासद कै. बानुबाई बापूराव दोडके ह्या सभासद होत्या. त्यांच्या नावावर संस्थेमध्ये प्लॉट क्र. ३७ / शेअर्स / मिळकत क्रमांक 5B. ५००४१७४ जुना क्र १०१/३ आहे. त्यांचे निधन दि ३१/०३/१९९७ रोजी झाले.

**कै. बानुबाई दोडके** यांना खालील वारस असल्या बाबत सिव्हील जज ज्युनी. डिव्ही. बारामती यांचा निर्णय दि. १६/११/२०२१ रोजी दिला आहे.

**१. श्रीम. जयश्री रामचंद्र सावंत वय - ५२ घरकाम । वडकेनगर ।**
**२. संतोष रामचंद्र सावंत । ४० । मजुरी । बारामती ।**
**३. चंद्रकांत रामचंद्र सावंत । ३८ । मजुरी**
**४. सौ. रेखा शामराव दोडके । ३६ । घरकाम**
**५. सौ. हेमा विजय ननवरे । ३४ । घरकाम**

वरील हुकूमनामा संस्थेकडे सादर करुन वरील पाच व्यक्तींची संस्था दप्तरी वारस म्हणून नोंद घेण्यात आली आहे. तसेच वरील पाच जणांपैकी श्री. संतोष रामचंद्र सावंत यांच्या नावावर संस्थेतील मिळकत/प्लॉट/ शेअर्स हस्तांतर करण्यात येण्या बद्दल त्यांच्या व्यतिरिक्त इतर चौघाजणांनी संस्थेकडे प्रतिज्ञापत्राद्वारे संमती दिलेली आहे. म्हणून संस्था श्री. संतोष रामचंद्र सावंत यांच्या नावावर बानुबाई बापूराव दोडके यांच्या नावावर असणारी घर मिळकत हस्तांतर करून सभासद करून घेणार आहे. तसा रितसर प्रस्ताव संस्थेला सादर केला आहे. सदर हस्तांतरणास कोणाची कांही हरकत/ तक्रार असल्यास १५ दिवसांचे आत संस्थेकडे सादर कराव्यात. तदनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कोणाचीही तक्रार संस्थेकडे आली नाही/प्राप्त झाली नाही तर संस्था हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करेल. याची नोंद बारामती परिसरातील नागरिकांनी घेण्यासाठी व सदर जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामिण यांचे कार्यालय ५, बी. जे. रोड, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, पुणे ४११ ००१**

दुरध्वनी: ०२० - २६१२५७७९ email:ddrpunegramin@gmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये**

**जाहिर नोटिस**

अर्ज क्रमांक १२/२०२६-२७ /१७६५
दिनांक-२९/०७/२०२६

**नियोजित वर्षा अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या.,** **अर्जदार**
सर्व्हे नं. २७७/१/३, प्लॉट नं. १४, (नविन गट नं. २७७/१/अ/३) (प्लॉट नं. १४), टी.सी. कॉलेज रोड, बारामती, ता. बारामती जि. पुणे. तर्फे **मुख्य प्रवर्तक श्री संतोष तुकाराम साळुंके**

**विरूध्द**

एस.एम.अनपट ॲण्ड असोसिएटस, भागीदारी फर्म तर्फे भागीदार **जाबदेणार**
**श्री शशिकांत माधवराव अनपट** रा. बारामती भोरी चाळ आमराई, ता. बारामती जि. पुणे.
**श्री जयपाल भरमू मगदुम,** रा. बारामती भोरी चाळ आमराई, ता. बारामती जि. पुणे.

वरील नमूद अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने वरील नमूद मुख्य प्रवर्तक यांनी संस्थेच्या नोंदणीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर नियोजित संस्थेच्या नोंदणी प्रस्तावाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक **१०/०८/२०२६ रोजी दुपारी** ०३.३० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे १ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही. असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ठिकाण: पुणे.
दिनांक: २७/०७/२०२६

शिक्का

**(प्रकाश ल. जगताप)**
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था पुणे ग्रामीण, पुणे

# जेऊरचे चौफुले बनले मृत्यूचे सापळे!

## विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात; अपघातासाठी 'ब्लॅक स्पॉट'



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**छत्रपती संभाजीनगर महामार्गावर जेऊर येथील चौकांबरोबरच गजराजनगर चौक, शेंडी पोखर्डी चौक, बायपास रोड, धनगरवाडी, गवारे वस्ती चौक, इमामपूर मुख्य चौक, बहिरोबा मळा चौक तसेच घाट परिसर अपघातासाठी 'ब्लॅक स्पॉट' ठरत आहेत. या ठिकाणी देखील अपघात टाळण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी महामार्गालगतच्या ग्रामस्थांमधून होत आहे.**

**नगर तालुका :** छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील जेऊर मुख्य चौक आणि महावितरण कंपनी चौक अपघातांचा 'ब्लॅक स्पॉट' म्हणून ओळखले जात आहेत. अपघात, निष्पापांचे बळी आणि कायमचे अपंगत्व अशा अनेक घटना या चौकांनी घडलेल्या आहेत. शालेय विद्यार्थी व ग्रामस्थ जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. या चौकांनी अपघात टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी पंचक्रोशीतील ग्रामस्थांमधून करण्यात आली आहे.

जेऊर गावात जाणारा मुख्य चौक तसेच महावितरण कंपनी चौकात आजपर्यंत अनेक अपघात घडलेले आहेत. त्यामध्ये अनेकांनी आपले प्राण गमावले आहेत तर काही जण कायमचे अपंग झाले. येथील अपघातांची मालिका सुरूच आहे. त्यामुळे दोन्ही चौकामध्ये अपघात टाळण्यासाठी तात्काळ प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरु लागली आहे.

चापेवाडी, इमामपूर, तोडमल वस्ती, शेटे वस्ती, आढाववाडी, बेल्हेकर मळा, कोथिंबीरे वस्ती, ठोंबरे वस्ती, धनगरवाडी, माळखास परिसरातील शेकडो विद्यार्थी दररोज महामार्ग ओलांडून जेऊरमध्ये शिक्षणासाठी येतात. विद्यार्थी पायी किंवा सायकलने प्रवास करत असल्याने विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

जेऊर मुख्य चौक तसेच महावितरण कंपनी चौकात गतिरोधक, झेब्रा क्रॉसिंग पट्टे, रिफ्लेक्टर, सूचनाफलक, सिग्नल लाईट तसेच अपघात टाळण्यासाठी इतर उपाययोजना करण्याची मागणी मधुकर मगर, विकास कोथिंबीरे, सुनील पवार, राजेंद्र शिंदे, राजेंद्र ससे, बंडू पवार, ज्ञानदेव गोरे, एकनाथ वाघ यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी केली आहे.

# महिनाभर रायगव्हाण अंधारात!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**दोन डीपी बसवल्या, दोन्ही निकामी - संतप्त ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील रायगव्हाण गाव तब्बल एक महिन्यापासून अंधारात असून महावितरणाच्या हलगर्जीपणामुळे ग्रामस्थांचे जनजीवन अक्षरशः ठप्प झाले आहे. जळालेला वीज रोहित्र (डीपी) बदलण्यासाठी महावितरणाने दोन वेळा डीपी बसवल्या; मात्र पहिली डीपी अवघ्या पाच मिनिटांत निकामी झाली, तर दुसरी डीपी बसवूनही वीजपुरवठाच सुरू झाला नाही. त्यामुळे महावितरणाने नादुरुस्त रोहित्र बसवून वेळकाढूपणा केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

महिनाभर वीज नसल्याने गावात पिण्याच्या पाण्याचे तीव्र संकट निर्माण झाले आहे. मोबाईल चार्ज होत नसल्याने नागरिकांचा बाहेरील संपर्क तुटला असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही मोठा परिणाम झाला आहे. अनेक लहान व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होत आहे.

रायगव्हाण परिसरात ऊस शेती आणि वनक्षेत्र मोठ्या प्रमाणावर असल्याने बिबट्याचा मुक्त संचार कायम असतो. यापूर्वी पाळीव जनावरांवर हल्ल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. अशा परिस्थितीत संपूर्ण गाव अंधारात असल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय परिसरात चोरीच्या घटनांमध्येही वाढ झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.गावातील प्रसिद्ध जगदंब देवी मंदिरात दररोज होणारी आरतीही वीजअभावी अंधारात होत आहे. धार्मिक कार्यक्रमांसह दैनंदिन जीवनावरही या परिस्थितीचा विपरीत परिणाम झाला आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, महावितरणाच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. वारंवार पाठपुरावा करूनही केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात समस्या कायम असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप आहे.ग्रामस्थांनी त्वरित नवीन आणि कार्यक्षम डीपी बसवून वीजपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला आहे.महिनाभर अंधारात असलेल्या रायगव्हाणच्या प्रश्नाकडे महावितरण प्रशासन आता गांभीर्याने लक्ष देणार का, की ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागणार, याकडे संपूर्ण श्रीगोंदा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## द•ख•ल

### रंधवे यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा



**कर्जत :** तालुक्यातील भांबोरा येथील रहिवाशी सद्या रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण, ता. पनवेल येथील श्रीछत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनियर कॉलेजमधील ज्येष्ठ शिक्षक सागर शंकर रंधवे यांच्या प्रदीर्घ व प्रदर्शनीय शैक्षणिक सेवेनंतर आज शुक्रवारी सेवानिवृत्तीनिमित्त सेवापूर्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले आहे. रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. या सोहळ्यास रयत शिक्षण संस्थेचे अन्य मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, जनरल बॉडी सदस्य,पदाधिकारी, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, स्थानिक शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सागर रंधवे यांनी प्रदीर्घ सेवाकाळात अध्यापनासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांमध्ये सक्रिय योगदान दिले. शैक्षणिक, कला, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक तसेच क्रीडा क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. ते प्रतिभाशाली लेखक, कवी व अष्टपैलू अभिनेते आहेत. त्यांच्या या सेवाकार्याचा गौरव करण्यासाठी या विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी तसेच हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून, सागर रंधवे यांच्या सेवाकार्याचा गौरव करावा, असे आवाहन विद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

### ग्रामीण भागातील गुणवंतांचा गौरव समाजाला प्रेरणा देणारा : ॲड. काकडे



**शेवगाव :** बोधेगावसारख्या ग्रामीण भागातील युवकांमध्ये शिक्षण, क्रीडा व विविध स्पर्धात्मक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करण्याची जिद्द आणि क्षमता आहे. प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत हे विद्यार्थी आज यशाची शिखरे गाठत असल्याने त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन त्यांच्या यशाचा गौरव केल्याने समाजात सकारात्मक आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण होण्यास निश्चितच हातभार लागणार असल्याचे प्रतिपादन आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड.शिवाजीराव काकडे यांनी बोधेगाव येथे केले. यावेळी माणिक गर्जे, भारत लांडे, सावता सुसे, राजेंद्र भांगरे, श्रीकृष्ण निकम, डॉ.फसले, डॉ.हेमंत गांगुर्डे, राजेश मोकाटे, राजेंद्र फलके, सुनील पडोळे, ईश्वर वाबळे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.



### बुद्धांचा धम्म मार्गच मानव कल्याणाचा : गायकवाड

**अहिल्यानगर :** भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगर शहर शाखेच्या वतीने वर्षावास प्रवचन मालिका २०२६ ची सुरुवात सावेडी गाव येथील बुद्ध विहारात उत्साहात करण्यात आली. कार्यक्रमात त्रिसरण, पंचशील ग्रहण आणि बुद्धपूजेनंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे यांनी वर्षावास प्रवचन मालिकेची अधिकृत घोषणा केली. प्रमुख प्रवचनकार तथा महिला जिल्हाध्यक्षा सुनीताताई गायकवाड यांनी 'तथागत भगवान गौतम बुद्ध विश्वधम्मगुरू' या विषयावर मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, आषाढी पौर्णिमेच्या दिवशी भगवान गौतम बुद्धांनी पंचवर्गीय भिक्खूंना प्रथम धम्मोपदेश देऊन संघाची स्थापना केली. त्यामुळे बौद्ध जगतात आषाढी पौर्णिमेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भगवान बुद्धांनी मानवजातीला दिलेला पंचशीलाचा मार्ग हा शांतता, समता आणि मानवकल्याणाचा मार्ग आहे. प्रत्येकाने आपल्या जीवनात पंचशीलाचे पालन करण्याचा संकल्प केला तर संपूर्ण मानवजातीचे कल्याण साध्य होईल. प्रास्ताविकात शहराध्यक्ष दिपक पाटोळे यांनी सांगितले की, आषाढी पौर्णिमेपासून अश्विन पौर्णिमेपर्यंत संपूर्ण शहरात वर्षावास प्रवचन मालिका राबविण्यात येणार असून भगवान बुद्धांच्या धम्माचा प्रचार व प्रसार विविध उपक्रमांच्या माध्यमातून केला जाणार आहे. यावेळी राजेंद्र साळवे, सुनीता गायकवाड, रवींद्र कांबळे, दिपक पाटोळे, गौतम पाचारणे, लक्ष्मण माघाडे, विजय चाबुकस्वार, युवराज बनसोड, बापू भिंगारदिवे, मोहन शिरसाट, मिलिंद घाटेशाही, विजय पाटोळे, विजय कांबळे, राजेंद्र थोरात, चव्हाण, ॲड. विद्या शिंदे, हर्षा पंचमुख, रेखा भिंगारदिवे, दिपा चव्हाण, सदाशिव भिंगारदिवे, ॲड. किरण भिंगारदिवे, शारदा भिंगारदिवे, अलका भिंगारदिवे, सुनील भिंगारदिवे, राजू भिंगारदिवे, रंजना भिंगारदिवे, अजय भिंगारदिवे, विलास भिंगारदिवे, शोभा भिंगारदिवे, वर्षा भिंगारदिवे, कौसल्या भिंगारदिवे, बेबी भिंगारदिवे यांच्यासह उपासक-उपासिका, महिला, युवक आणि बालक-बालिका उपस्थित होते.

# सरपंच पवार यांचा जामीन मंजूर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील गावचे सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षाचे नगर तालुकाध्यक्ष शरद खंडेराव पवार यांना कथित अपहरण, मारहाण व खंडणी प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणातील यापूर्वी दोन आरोपींना अटकपूर्व जामीन, तर एका आरोपीला सत्र न्यायालयातून नियमित जामीन मिळाला होता. या प्रकरणात शरद पवार यांच्यासह चार जणांविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी किशोर महादेव परभने यांनी खासदार निलेश लंके यांच्याविषयी गंभीर स्वरूपाची सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याच्या कारणावरून पुणे येथून आपले अपहरण करण्यात आले, मारहाण करण्यात आली आणि खंडणीची मागणी करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत केला होता.

# गुरुपौर्णिमेनिमित्त संस्कारमय बालदिंडी



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** कर्नल परब संचलित सनबीम्स प्री-प्रायमरी शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि गुरुजनांविषयी आदरभाव रुजविण्याच्या उद्देशाने गुरुपौर्णिमा निमित्त संस्कारमय बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीच्या माध्यमातून चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांचा उत्साह, टाळ-मृदंगाचा निनाद आणि 'विठ्ठल... विठ्ठल...'च्या अखंड नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.

# कोरडगावसह तीन गावांत दमदार पाऊस

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव :** पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव, आखेगाव आणि सोमठाणे नलवडे परिसरात गुरुवारी सायंकाळी चारच्या सुमारास जोरदार पावसाने हजेरी लावली. काही दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना या दमदार सरींमुळे मोठा दिलासा मिळाला असून खरीप हंगामातील शेतीच्या मशागतीला पुन्हा वेग आला आहे. दुपारपर्यंत वातावरणात उकाडा आणि दमटपणा जाणवत होता. त्यानंतर आकाशात काळ्या ढगांची दाटी होऊन सायंकाळी चारच्या सुमारास जोरदार पावसाला सुरुवात झाली. सुमारे काही काळ झालेल्या पावसामुळे शेतांमध्ये चांगला ओलावा निर्माण झाला. या पावसामुळे सोयाबीन, तूर, मका, बाजरी, मूग, उडीद आदी खरीप पिकांना मोठा फायदा होणार आहे. पेरणीनंतर आंतरमशागत, खतांची मात्रा देणे, तणनियंत्रण आणि इतर शेतीकामांना गती मिळणार असल्याने शेतकरी समाधान व्यक्त करत आहेत. गेल्या काही दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याने पिकांच्या वाढीबाबत चिंता निर्माण झाली होती. मात्र, आज झालेल्या दमदार पावसामुळे पिकांना नवसंजीवनी मिळाली असून शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. आगामी काही दिवसही समाधानकारक पाऊस सुरू राहिल्यास खरीप हंगामातील उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# एटीएम बंद... नागरिक हैराण!

## जेऊर येथील एटीएममध्ये बिघाड

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**नगर तालुका :** नगर तालुक्यातील सर्वात मोठ्या गावांपैकी एक असलेल्या जेऊर येथील महाराष्ट्र बँकेचे एटीएम मशीन गेल्या काही दिवसांपासून बंद असल्याने पंचक्रोशीतील शेतकरी, व्यापारी, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. यापूर्वी गावात कार्यरत असलेली दोन एटीएम मशीन बंद करण्यात आली असून सध्या महाराष्ट्र बँकेचे एकमेव एटीएमही नादुरुस्त झाल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

जेऊर तालुक्यातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र असून परिसरातील सुमारे १५ ते १६ गावांतील नागरिक दैनंदिन आर्थिक व्यवहारांसाठी या गावावर अवलंबून आहेत. शासनाच्या विविध योजनांचे अनुदान, शेतकऱ्यांच्या कर्जाची प्रकरणे, शासकीय लाभ, पेन्शन, शिष्यवृत्ती तसेच इतर बँकिंग व्यवहारांसाठी परिसरातील नागरिकांना जेऊर येथील महाराष्ट्र बँकेवरच अवलंबून राहावे लागते. परिसरात दुसरी कोणतीही राष्ट्रीयीकृत बँक नसल्याने नागरिकांसमोर पर्याय उपलब्ध नाही.

एटीएम बंद असल्यामुळे अनेकांना रोख रक्कम काढण्यासाठी अडचण येत आहे. त्यासाठी अतिरिक्त वेळ आणि प्रवासखर्च सहन करावा लागत असून विशेषतः शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि मजूर वर्गाला याचा मोठा फटका बसत आहे. बाजारपेठेतील किरकोळ व्यवहार, शेतीसाठी लागणाऱ्या वस्तूंची खरेदी तसेच दैनंदिन गरजा भागविताना नागरिकांची मोठी अडचण होत आहे.

गावात यापूर्वी कार्यरत असलेली दोन एटीएम केंद्रे बंद झाल्यानंतर महाराष्ट्र बँकेच्या एटीएमवरच संपूर्ण पंचक्रोशीचा भार आला होता. मात्र हेच एटीएम नादुरुस्त झाल्याने आर्थिक व्यवहारांवर परिणाम होत असून नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. एटीएमचा बिघाड तातडीने दूर करून सेवा पूर्ववत करावी. अशी मागणी पंचक्रोशीतील नागरिकांमधून केली जात आहे.

# गुरुंमुळेच विद्यार्थ्यांची जडणघडण : ॲड. खिलारी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** गुरु हा विद्यार्थ्यांना अंधाराकडून प्रकाशाकडे नेत असतो.गुरूंमुळेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व जडणघडण होत असते.आपल्याला कोणत्या ना कोणत्या मार्गाने मार्गदर्शन करणारा समाजातील प्रत्येक घटक हा आपला गुरुच असल्याचे प्रतिपादन खरेदी विक्री संघाचे मा.अध्यक्ष ॲड.रघुनाथ खिलारी यांनी केले.

श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्य.विद्यालयात, गुरुपौर्णिमा उत्सव व जिल्हा मराठा संस्थेचे माजी सचिव कै.रावसाहेब म्हस्के यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या सुरुवातीस महर्षी व्यास व संस्थेचे माजी सचिव कै.रावसाहेब म्हस्के यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना खिलारी म्हणाले की,गुरुपौर्णिमा म्हणजेच व्यास पौर्णिमा या दिवशी महर्षी व्यास यांचा जन्म झाला.या दिवशी विद्यार्थी आपल्या गुरूंविषयी आदर व्यक्त करतात. यावेळी विद्यालयाच्या वतीने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. बाळासाहेब खिलारी, बाळासाहेब निवडुंगे, लहूशेठ जाधव, अशोक गांगड, मल्हारी वाघस्कर, नारायण शेळके, अनिता म्हस्के, भाऊसाहेब हिंगडे, बाबासाहेब जाधव, अतुल सैद, सुरेखा ठाणगे, प्रिया डव्हणे, भाऊसाहेब भांबेरे, नारायण हरेल, होरणे भाऊसाहेब सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु एसआर/१२२/२०२६
नेवासा दिनांक. २९/०६/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-सुनिल पोपट माळी रा. वंजारवाडी, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. ज्योती सुनिल माळी रा. वंजारवाडी, ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव - ज्योती सुनिल माळी, गावाचे नाव-वंजारवाडी, जन्म दिनांक-२३/११/२००५ करिता

या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी कुळधरण ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम रोहित रोहिदास भवाळ रा. कुळधरण ता कर्जत जि. अहिल्यानगर यांनी स्वता नामे श्री/श्रीम रोहित रोहिदास भवाळ या नावे जन्म / मृत्यू प्रमाणपत्र मीळणे बाबत मागणी केलेली आहे. सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू **कुळधरण ता. कर्जत जि. अहिल्यानगर** या ठिकाणी दि १५/०६/२००३ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि ०९/०४/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे. वरील व्यक्तीच्या जन्म / मृत्यू बाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक ३०/०७/२०२३

शिक्का

सही/-
**(रवि सतवन )**
**तहसिलदार कर्जत**

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी राशीन ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम सोमनाथ लक्ष्मण पवार रा. डोर्लेवाडी ता. बारामती जि.पुणे यांनी मुलगा नामे श्री/श्रीम शिवराज सोमनाथ पवार या नावे जन्म / मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत मागणी केलेली आहे. सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू **राशीन ता. कर्जत जि. अहिल्यानगर** या ठीकाणी दि २६/१२/२०१० रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि १३/०७/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे. वरील व्यक्तीच्या जन्म / मृत्यू बाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
**(रवि सतवन )**
**तहसिलदार कर्जत**

### जाहीर नोटीस

तहसिल कार्यालय कोपरगांव
क्र. कावि/फौजदारी/७९/२०२६
कोपरगांव दि. २८/०७/२०२६

कोपरगांव येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.
इनामदार शमिना बन्नुभाई, रा. डाऊच खु. ता. कोपरगांव,
जि. अहिल्यानगर
विरुध्द
निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा
ग्रामसेवक ग्रामपंचायत डाऊच खु.
ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी, अर्जदार इनामदार शमिना बन्नुभाई रा. डाऊच खु. ता. कोपरगांव जि अहिल्यानगर जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार नामे इनामदार शमिना बन्नुभाई यांची आई या दिनांक. १९/०५/१९७२ रोजी मौजे. डाऊच खु. ता. कोपरगांव येथे प्रसुत होऊन अर्जदार नामे इनामदार शमिना बन्नुभाई यांचा जन्म झाला आहे. सदर अर्जदार यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय डाऊच खु. ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे. तथापी अर्जदार यांचे जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिष्टरला नोंद होण्याकामी तसा मे. कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये, अर्जदार यांचे जन्म दिनांक. १९/०५/१९७२ रोजी मौजे. डाऊच् खु. ता. कोपरगांव येथे झाला आहे. अर्जदार यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय डाऊच खु. ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत मे. कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही. असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालनार नाही. याची जाहीर नोंद या जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे.

आज दि. २८/०७/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिले.

**हुकूमावरुन**
**तहसिलदार कोपरगांव**

### जाहीर नोटीस

तहसिल कार्यालय कोपरगांव
क्र.कावि/फौजदारी/८०/२०२६
कोपरगांव दि. २८/०७/२०२६

कोपरगांव येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.
इनामदार अल्लाबक्श बन्नुभाई रा. डाऊच खु. ता. कोपरगांव
जि. अहिल्यानगर
विरुध्द
निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा
ग्रामसेवक ग्रामपंचायत डाऊच खु.ता. कोपरगांव, जि.अहिल्यानगर

ज्याअर्थी, अर्जदार इनामदार अल्लाबक्श बन्नुभाई रा. डाऊच खु. ता. कोपरगांव जि अहिल्यानगर जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार नामे इनामदार अल्लाबक्श बन्नुभाई यांची आई या दिनांक. ०२/०६/१९७५ रोजी मौजे. डाऊच खु. ता. कोपरगांव येथे प्रसुत होऊन अर्जदार नामे इनामदार अल्लाबक्श बन्नुभाई यांचा जन्म झाला आहे. सदर अर्जदार यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय डाऊच खु. ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे. तथापी अर्जदार यांचे जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिष्टरला नोंद होण्याकामी तसा मे. कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये, अर्जदार यांचे जन्म दिनांक. ०२/०६/१९७५ रोजी मौजे. डाऊच् खु. ता. कोपरगांव येथे झाला आहे. अर्जदार यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय डाऊच खु. ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत मे. कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालनार नाही. याची जाहीर नोंद या जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे.

आज दि. २८/०७/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिले.

**हुकूमावरुन**
**तहसिलदार कोपरगांव**

## नगरपंचायत कार्यालय, कर्जत

ता. कर्जत, जि. अहिल्यानगर
Phone ०२४८९-२२२०१२ ULB Code ९००३७७ Email id-cokarjat55@gmail.com

जा.क्र.२०२६-२७/१६१६/२०२६ दि. ३१/०७/२०२६

### जाहीर सूचना

केंद्र शासनाद्वारे पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथविक्रीचे विनियमन) अधिनियम, २०१४ दिनांक ०५ मार्च, २०१४ रोजी लागू करण्यात आला असून, सदर अधिनियमाच्या कलम ३६(१) अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथविक्रीचे विनियमन) नियम, २०१६ दिनांक ०३ ऑगस्ट २०१६ रोजी अधिसूचित केले आहेत. पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथविक्रीचे विनियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम २० तसेच महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथविक्रीचे विनियमन) नियम, २०१६ मधील प्रकरण २ मधील नियम ३ व ४ नुसार प्रत्येक स्थानिक प्राधिकरणासाठी '**तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करणे बंधनकारक आहे.**' सदर नियमानुसार प्रत्येक स्थानिक प्राधिकरणासाठी गठीत करण्यात येणाऱ्या तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीमध्ये अध्यक्ष म्हणून दिवाणी न्यायाधीश अथवा न्यायदंडाधिकारी तसेच सदस्य म्हणून इतर दोन व्यावसायिक व्यक्तींचा समावेश असणे आवश्यक आहे. समितीच्या अध्यक्ष व सदस्यांना कार्यकाळ पाच वर्षांचा असेल.

सदर '**तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती**' मध्ये सदस्य म्हणून नियुक्तीसाठी नियम ४ नुसार खालील अर्हता व अनुभव असलेल्या व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| पदाचे नाव | पदसंख्या | अ.क्र. | अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती सदस्य | २ | १ | वय ३५ वर्षापेक्षा अधिक व ६५ वर्षापेक्षा कमी असावे. |
| | | २ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी धारण केलेली असावी. |
| | | ३ | स्थानिक प्राधिकरणामधील कामाचा अनुभव असावा व स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये शासनाच्या अवर सचिव किंवा तत्सम दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पदावर कार्य केलेले असावे. |
| | | ४ | कार्यकुशलता, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असावी तसेच सामाजिक कार्य पथविक्रेते, सार्वजनिक काम अथवा नागरी / सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित विषयांमध्ये किमान १० वर्षाचा पर्याप्त अनुभव किंवा ज्ञान असावे. |

तरी पात्र इच्छुक व्यक्तींनी आपले अर्ज दि. ०७/०८/२०२६ पर्यत आवश्यक त्या कागदपत्रांसह साक्षांकित प्रतीसह कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर करावेत. या विषयी अधिक माहितीसाठी कर्जत नगरपंचायत कर्जत येथे संपर्क साधावा.

**ठिकाण -कर्जत नगरपंचायत कर्जत**
**दिनांक ३१/०७/२०२६**

शिक्का

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**कर्जत नगरपंचायत कर्जत**

**सही/-**
**उपाध्यक्ष**
**कर्जत नगरपंचायत कर्जत**

**सही/-**
**अध्यक्ष**
**कर्जत नगरपंचायत कर्जत**

# जेऊरच्या शाळा परिसरात पोलिसांचा 'वॉच'!

## कोणाचीही गय नाही, रोड रोमिओंना सज्जड इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**नगर तालुका :** शाळा, खासगी क्लासेस तसेच सार्वजनिक ठिकाणी विनाकारण घुटमळत विद्यार्थिनींची छेड काढणाऱ्या अथवा संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या रोड रोमीओंविरुद्ध एमआयडीसी पोलीस स्टेशनने आक्रमक भूमिका घेतली आहे. पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे यांच्या नेतृत्वाखाली जेऊर गावातील शाळा, खासगी क्लासेस परिसर, प्रमुख चौक तसेच विविध अंतर्गत रस्त्यांवर पोलिसांची गस्त वाढविण्यात आली असून रोडरोमींओंची गय केली जाणार नाही असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

एमआयडीसी पोलिसांनी जेऊर परिसरात गस्त वाढवून संशयास्पद युवकांवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. या कारवाईमुळे परिसरातील रोड रोमीओंनी धास्ती घेतल्याचे चित्र सध्या पाहावयास मिळत असून अनेक ठिकाणी विनाकारण घुटमळणारे युवक अचानक गायब झाले आहेत.

पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, विद्यार्थिनींना निर्भय, मोकळ्या आणि सुरक्षित वातावरणात शिक्षण घेता यावे त्यासाठी पोलिसांकडून कडक भूमिका घेण्यात येणार आहे. त्यामुळे शाळा, क्लासेस किंवा सार्वजनिकठिकाणी विद्यार्थिनींना त्रास देणाऱ्या कोणाचीही गय केली जाणार नाही. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.

**दै. राष्ट्र सह्याद्री इफेक्ट**

एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली जेऊर बीटमधील सर्व पोलीस कर्मचारी रोड रोमीओंवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. आवश्यक त्या ठिकाणी गस्त, चौकशी आणि तपासणी सुरू केली आहे. ही मोहीम सातत्याने सुरू राहणार असल्याचे मोंढे यांनी स्पष्ट केले आहे.

जेऊर पंचक्रोशीतील अनेक वाड्या-वस्त्यांवरुन विद्यार्थिनी आणि विद्यार्थी शिक्षणासाठी जेऊरमध्ये येत असतात. काही निर्जन आणि ओसाड रस्त्यांमुळे विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे पोलिसांनी अशा मार्गांवर विशेष लक्ष केंद्रित केले असून पालकांनीही आपल्या मुलांच्या हालचालींवर लक्ष ठेवावे असे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यार्थिनींना कोणत्याही प्रकारचा त्रास, छेडछाड किंवा संशयास्पद प्रकार आढळल्यास भीती न बाळगता शिक्षक, पालक किंवा पोलिसांशी तात्काळ संपर्क साधावा असे आवाहनही पोलिसांनी केले आहे. रोड रोमीओंविरोधात सुरू करण्यात आलेल्या मोहिमेचे जेऊरसह पंचक्रोशीतून स्वागत होत आहे. पोलिसांनी अशीच सातत्यपूर्ण कारवाई कायम ठेवावी अशी मागणी नागरिक, पालक आणि शिक्षकांकडून करण्यात येत आहे.

# केदारेश्वरचे ४ लाख मे. टन गाळपाचे उद्दिष्ट : ढाकणे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**हातगाव :** संघर्ष योद्धा बबनराव ढाकणे केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याने गत गळीत हंगामात उशिरा सुरु केलेला हंगाम प्रतिकूल परिस्थितीवर यशस्वीपणे मात करत पूर्ण केला असून आताही याच धर्तीवर येणारा सन २६-२७ चा गळीत हंगामही यशस्वीपणे पार पाडण्याचा निर्धार कारखाना प्रशासनाने व्यक्त केला असून, ४ लाख मेट्रिक टनांहून अधिक ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष ऋषिकेश ढाकणे यांनी व्यक्त केली आहे. शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील संघर्ष योद्धा बबनराव ढाकणे केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या येणाऱ्या गळीत हंगामाच्या पहिल्या मिल रोलरचे पूजन काल गुरुवार रोजी सकाळी कारखान्याचे माजी अध्यक्ष ड. प्रतापराव ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष ऋषिकेश ढाकणे यांच्या हस्ते विधिवत पूजा करून करण्यात आले. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आगामी गळीत हंगामासाठी कारखान्याच्या देखभाल व दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरू असून सर्व यंत्रणा वेळेत कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक तयारी अंतिम टप्प्यात आहे. मागील वर्षी कारखान्याच्या कार्यक्षेत्रात तसेच कार्यक्षेत्राबाहेर मोठ्या प्रमाणात उसाची लागवड झाल्याने यंदा ४ लाख मेट्रिक टनांहून अधिक ऊस गाळप होईल, ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊस तोडणी व वाहतूक करताना घाईगडबड न करता कारखान्याच्या नियोजनानुसार व नोंदीनुसारच ऊस गाळपासाठी पाठवावा. त्यामुळे गाळप प्रक्रिया सुरळीत पार पडेल आणि प्रत्येक शेतकऱ्याचा ऊस वेळेत गाळपासाठी स्वीकारता येईल. मागील वर्षीप्रमाणेच यंदाही शेतकऱ्यांनी केदारेश्वर सहकारी साखर कारखान्यावर विश्वास ठेवून आपला ऊस कारखान्यालाच द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी रमेश गर्जे, पोपटराव केदार, तीर्थराज घुंगरड, तुकाराम वारे, राजाराम केसभट, शरद सोनवणे, अभिजित बुधवंत, अभिमन्यू विखे, प्रवीण काळुसे, कारभारी जावळे, शहाजी जाधव, विजय विखे, त्रिंबक चेमटे, आयुब शेख, अंबादास दहिफळे, सुधाकर खोले यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य, ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन लीगल ऑफिसर शरद सोनवणे यांनी केले, तर आभार जनरल मॅनेजर रमेश गर्जे यांनी मानले.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची बदलीची मागणी

## प्रशासनाने घेतली दखल, उपोषण स्थगित

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**राशीन :** राशीन ग्रामपंचायत हद्दीतील गट क्रमांक १४७६ व १४७७ मधील रहिवाशांच्या न्याय्य मागण्यांकडे दीर्घकाळ दुर्लक्ष करणाऱ्या ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात सुरू करण्यात आलेल्या आमरण उपोषणाची अखेर कर्जत पंचायत समिती बीडीओ सूर्यवंशी साहेब प्रशासनाला गंभीर दखल घ्यावी लागली. महाराष्ट्र शासनाच्या २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याची प्रक्रिया राबविण्यात ग्रामपंचायतीने केलेल्या विलंबामुळे संतप्त नागरिकांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला होता.

उपोषणकर्त्यांच्या मागण्यांची दखल घेत गटविकास अधिकाऱ्यांनी दिलेल्या लेखी पत्रात संबंधित शासन निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना ग्रामपंचायतीला देण्यात आल्या आहेत. तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणांचा नियमांनुसार निपटारा करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

दरम्यान, ग्रामपंचायत अधिकारी आर. ए. कापरे यांनी स्वतःच वरिष्ठांकडे बदलीची मागणी केल्याची बाब समोर आली आहे. उपोषणकर्त्यांच्या आग्रही भूमिकेमुळे ग्रामपंचायतीचे कामकाज प्रभावित होत असल्याचे नमूद करत त्यांनी अन्यत्र बदली करण्याचा प्रस्ताव सादर केला. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शासन निर्णयाच्या अंमलबजावणीत झालेल्या विलंबामुळे त्यांच्या कर्तव्यात कसूर झाल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये रंगली आहे. या आंदोलनाला माजी सरपंच अल्लाउद्दीन काझी, संदेश धोसे, शाहूराजे भोसले, विजय नाना मोढळे, मालोजी भिताडे, अशोक जंजीरे, कमलेश साळवे, सचिन साळवे, सचिन आढाव, संकेत पाटील, दादासो कानगुडे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला.

२५ मार्च २०२६ च्या शासन निर्णयाची ग्राम विकास अधिकारी कापरे भाऊसाहेब यांच्याकडून शासन निर्णयाची पायमल्ली . अंमलबजावणी झाली असती, तर उपोषणाची वेळच आली नसती चा आरोप तात्यासाहेब माने यांनी केला आहे. आता प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते की पुन्हा एकदा नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो, याकडे संपूर्ण राशीनचे लक्ष लागले आहे.

# घोगरगावच्या सरपंच सुजाता भोसले यांच्या विरोधातील अर्ज फेटाळला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** तालुक्यातील घोगरगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सुजाता मिलिंद भोसले यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या वाद अर्जावर जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी महत्त्वपूर्ण निर्णय देत अर्जदाराचा दावा नामंजूर केला आहे. त्यामुळे सरपंच सुजाता मिलिंद भोसले यांना मोठा दिलासा मिळाला आहे. श्रीगोंदा तालुक्यातील घोगरगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सुजाता मिलिंद भोसले यांच्या विरोधात अर्जदार विजया सुदाम बोरुडे यांनी सरपंच सुजाता मिलिंद भोसले व ग्रामपंचायत घोगरगाव यांच्या विरोधात अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. या प्रकरणात दोन्ही बाजूंचा युक्तिवाद, सादर करण्यात आलेले कागदपत्रे आणि कायदेशीर तरतुदींचा विचार केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी अर्ज फेटाळत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १४(१)(अ-३) व १६ अन्वये हा निर्णय देण्यात आला असून या निर्णयामुळे सरपंच सुजाता मिलिंद भोसले यांच्या विरोधातील जिल्हास्तरीय वादाला पूर्णविराम मिळाला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर गावात विविध स्तरावर चर्चांना उधाण आले असून, सरपंचांच्या समर्थकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दरम्यान, या आदेशाविरुद्ध संबंधित पक्षाला कायद्यानुसार पुढील अपील करण्याचा अधिकार कायम आहे. सरपंच सुजाता मिलिंद भोसले म्हणाल्या : जिल्हाधिकारी महोदयांनी सर्व कागदपत्रे, पुरावे आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून न्याय्य निर्णय दिला आहे.

# नविन विहीर अनुदानासाठी शेवगाव तालुक्यातील ६७ गावे पात्र

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**हातगाव :** गेल्या काही वर्षांपासून शेवगाव तालुक्यातील काही गावांमध्ये रोजगार हमी योजना तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजनेचा नवीन विहीरिचा लाभ घेण्यासाठी तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांना अडचणी येत होत्या. मात्र भूजल सर्वेक्षण विभाग, अहिल्यानगर यांचे कडील आदेशानुसार नवीन विहिर अनुदान घेण्यासाठी तालुक्यातील ६७ गावे पात्र ठरली आहे. जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे व गटविकास अधिकारी सोनल शहा यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील १० गावामध्ये अनुसूचित जाती व जमातीच्या शेतकऱ्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजने अंतर्गत नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, पंप संच, शेततळे प्लास्टिक अस्तरीकरण, पी व्ही सी पाईप इत्यादी योजनाची प्रचार व प्रसिद्धी साठी शेतकरी मेळाव्याचे आयोजन कृषि विभाग पंचायत समिती शेवगाव यांचे मार्फत करण्यात आले असल्याचे पंचायत समितीचे कृषी अधिकारी ज्ञानदेव गुरगुडे यांनी याबाबत माहिती दिली. या योजनांचा मागासवर्गीय शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करून जास्तीत जास्त शेतकऱ्यानी लाभ घेण्याचे आवाहन कृषि अधिकारी ज्ञानदेव गुरगुडे यांनी अनुसूचित जाती व जमातीच्या शेतकरी मेळावा मध्ये केले आहे. नवीन विहिर घेण्यासाठी केवळ भूजल सर्वेक्षणानुसार सुरक्षित क्षेत्रातील गावांतील शेतकरीच पात्र राहतील. मात्र ज्या शेतकऱ्यांकडे यापूर्वीच विहीर उपलब्ध आहे, त्यांना नवीन विहीर वगळता इतर कृषी योजनांचा लाभ शेवगाव तालुक्यातील सर्व गावांमधून घेता येणार आहे.

भूजल सर्वेक्षणात सुरक्षित झोन मध्ये समाविष्ट करण्यात आलेली गावे पुढील प्रमाणे आहेत .अधोडी, अमरापूर, अंतरवाली बुद्रुक, अंतरवाली खुर्द ने., अंतरवाली खुर्द शे, आव्हाणे बुद्रुक, आव्हाणे खुर्द, बाडगव्हाण, बालमटाकळी, बऱ्हाणपूर, बेलगाव, भगूर, बोधेगाव, चापडगाव, चेडेचांदगाव, दहीफळ, दहीगाव शे., दहीगाव ने., देवळाणे, दिवटे, एरंडगाव, गदेवाडी, गायकवाड-जळगाव, घोटन, गोळेगाव, हसनापूर, हातगाव, हिंगणगाव ने., जोहारापूर, कांबी,कऱ्हेटाकळी, खडके, खामपिंपरी, खानापूर,कोळगाव,कुरुडगावं, लाडजळगाव, लखमापुरी, लाखेफळ, मडके, माळेगाव ने, मंगरूळ बु, मंगरूळ खुर्द, मुंगी, मुरमी, नागलवाडी, नजीक बाभूळगाव, पिंगेवाडी, प्रभूवाडगावं, राक्षी, रानेगाव, रांजनी,रावतळे, शहजापूर, शहापूर, शेकटे बु, शेकटे खुर्द, शिंगोरी, शोभानगर, सोने सांगवी, सोनविहीर, सुकळी, सुळे पिंपळगाव, सुलतान पूर खुर्द, ठाकूर निमगावं, ठाकूर पिंपळगाव, वडूले बू, वरखेड, वरुर बू या ६७ गावांचा समावेश आहे.

या निर्णयामुळे पात्र गावांतील शेतकऱ्यांना नवीन विहिर अनुदान लाभ मिळण्याचा मार्ग पुन्हा खुला झाला आहे. शेतकरी मेळाव्यासाठी पंचायत समिती कृषि विस्तार अधिकारी दिगंबर भांड व गौतम फाजगे आणि गावातील अनुसूचित जाती व जमातीचे शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

# श्रीगोंदा नगरपरिषदेचे लाखो खर्च... तरीही मोकाट कुत्र्यांचा हैदोस!

## केवळ २५० कुत्र्यांचे निर्बिजीकरण; उर्वरित २,२५० कुत्रे मोकाट?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** श्रीगोंदा नगरपरिषदेने शहरातील मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आतापर्यंत १ लाख ९३ हजार ५० रुपये खर्च केले आहेत. मात्र एवढा निधी खर्च होऊनही शहरातील रस्त्यांवर मोकाट कुत्र्यांचा वावर कमी झालेला नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे.त्यात भर आहे मोकाट जनावरांची यामुळे तालुक्यातील जनता पुरती हैराण झाली आहे.

श्रीगोंदा नगरपरिषदेकडून मिळालेल्या माहितीनुसार, श्रीगोंदा शहरात सुमारे २,५०० मोकाट कुत्रे आहेत. त्यापैकी आतापर्यंत केवळ २५० कुत्र्यांचे निर्बिजीकरण (ऑपरेशन) करण्यात आले आहे. त्यामुळे उर्वरित २,२५० कुत्र्यांचे निर्बिजीकरण नेमके कधी होणार? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.या योजनेअंतर्गत एका कुत्र्याला पकडणे, निर्बिजीकरण, लसीकरण आणि देखभालीसाठी प्रति कुत्रा १९५० रुपये खर्च केला जातो. या काळात संबंधित कुत्र्यांना अंडी, दूध, भात, बिस्किटे आदी खाद्यही पुरविले जात असल्याची माहिती आहे.या कामाचा ठेका कल्पक बहुउद्देशीय संस्था, औरंगाबाद यांना देण्यात आला आहे. मात्र कामाच्या प्रगतीबाबत ठेकेदाराशी संपर्क साधला असता त्यांनी, त्रास दिल्यास मला हे काम मला करायचं नाही, अशी प्रतिक्रिया दिल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ठेकेदाराच्या या भूमिकेमुळे नगरपरिषद प्रशासन आणि नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, कामाकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे.नगरपालिकेतील सूत्रांच्या माहितीनुसार, हे काम च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सुरू आहे. मात्र प्रत्यक्षात शहरातील मोकाट कुत्र्यांची संख्या कमी होत नसल्याने या मोहिमेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.नागरिकांची मागणी आहे की, निर्बिजीकरण मोहिमेला गती देऊन मोकाट कुत्र्यांचा प्रश्न तातडीने सोडवावा आणि कामात हलगर्जीपणा करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करावी.

# आपल्या गुरुंबद्दल आदर व कृतज्ञता बाळगा : मोरे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. ज्ञान, संस्कार आणि मूल्यांची जोपासना करण्यामध्ये गुरुंची भूमिका सर्वोच्च असून प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या गुरुंबद्दल सदैव आदर व कृतज्ञता बाळगली पाहिजे असे प्रतिपादन प्राचार्य दत्तात्रय मोरे यांनी बोलताना व्यक्त केले. निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला त्यावेळी मोरे बोलत होते.कार्यक्रमाची सुरुवात महर्षी व्यास यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी श्रीमती प्रियंका म्हस्के यांनी गुरुंचे जीवनातील अनन्य साधारण स्थान विशद करत, गुरु हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे शिल्पकार असल्याचे सांगितले. बाळू निळ यांनी गुरुंच्या मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडते, असे बोलताना सांगितले श्रीमती रूपाली शेटे व बाळू कांबळे यांनी गुरूपौर्णिमा महत्व विषद केले.

## द • ख • ल

### गुरुवारी गव्हाणे बाबा पुण्यतिथी




**करंजी :** अहिल्यानगर आणि बीड जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या करंजी घाट, ता. पाथर्डी येथील सद्गुरू श्री संत गव्हाणे बाबा यांचा ३५ वा पुण्यतिथी सोहळा गुरुवार, दि.६ ऑगस्ट रोजी संपन्न होत आहे. गव्हाणे बाबा यांच्या पुण्यतिथी सोहळ्याच्या निमित्ताने गुरुवारी सकाळी साडेसात वाजता बाबांच्या संजीवन समाधीची महापूजा व अभिषेक कार्यक्रम पार पडणार आहे. त्यानंतर दुपारी बारा वाजता श्रीक्षेत्र पैठण येथून करंजी ,हरेवाडी, मराठवाडी या परिसरातील भाविकांनी आणलेल्या गंगाजलाने बाबांच्या समाधीस जलाभिषेक केला जाणार आहे. तसेच सकाळी दहा वाजता महंत ज्ञानेश्वर महाराज कराळे यांचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसाद दिला जाणार आहे. यावर्षीची महाप्रसादाची पंगत भानुदास सखाराम मराठे, सुनीता भानुदास मराठे, अविनाश भानुदास मराठे, अभिजीत भानुदास मराठे, हरेवाडी, ता. आष्टी यांच्या वतीने देण्यात येणार आहे. या पुण्यतिथी सोहळ्यासाठी पाथर्डी, आष्टी, नगर, शेवगाव तालुक्यासह बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन देवस्थानचे प्रमुख महंत ज्ञानेश्वर महाराज कराळे यांनी केले आहे.

### गुरु पौर्णिमा भारतीय संस्कृतीतील पवित्र उत्सव : मुरकुटे



**ढोरजळगांव :** गुरु पौर्णिमा हा आपल्या भारतीय संस्कृतीतील ज्ञान, संस्कार, श्रद्धा व कृतज्ञतेचा पवित्र उत्सव आहे. आपल्या जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या अज्ञानाचा अंधःकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणाऱ्या गुरुजनाप्रती आदर, कृतज्ञता व ऋण व्यक्त करण्याचा हा मंगल दिवस आहे असे श्रीधर मुरकुटे यांनी बोलताना व्यक्त केले. भातकुडगाव माध्य व उच्च माध्य विद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी सुनील शिंदे, सोपान सतरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकनेते स्व मारुतरावजी घुले पाटील साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्राचार्य सुरेश शेरे म्हणाले गुरु शिवाय सर्व निष्फळ आहे! गुरु पदस्पर्शाने पुनीत होते भूमी! गुरु आशीर्वादाने घडतो मानवप्राणी! गुरु केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत तर संकटावर कशी मात करावी, प्रामाणिकपणे कसे जगावे, आणि एक सुजान नागरिक होण्यासाठी संस्कार करतात. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात माहिती सहज मिळत असली तरी ज्ञानाचा व विवेकाचा योग्य वापर कसा करावा हे गुरूच शिकवून जातात म्हणूनच आपल्या जीवनात गुरूंचे स्थान सर्वोच्च आहे असे शेरे यांनी बोलताना सांगितले.

### गुरु पोर्णिमेनंतर भगवान गडावर स्वच्छतेचा महायज्ञ




**खरवंडी कासार :** श्री क्षेत्र भगवान गडावर नुकतीच गुरु पोर्णिमा व आषाढी एकादशीचा सोहळा मोठ्या भक्तिभावात साजरा झाला. लाखो भाविकांनी भगवानबाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या गडावर गर्दीचा महापूर आला होता. गर्दीचा महापूर येतो ही आणि ओसरतो ही, पण मागे राहते ती घाण. पण ही नेहमीची गोष्ट भगवान गडावर दिसत नाही. कारण सोहळा संपला की दुसऱ्या दिवशी सकाळीच स्वतः भगवान गडाचे प्रधानाचार्य नारायण स्वामी यांच्या देखरेखीखाली साफसफाईला सुरुवात होते. काही तासातच संपूर्ण गड स्वच्छ आणि सुंदर दिसू लागतो.

### टाकळी ढोकेश्वर येथे गुरुपौर्णिमा साजरी




**टाकळी ढोकेश्वर :** टाकळी ढोकेश्वर येथील रामदास भाऊसाहेब बांडे शिष्य मंडळाच्या वतीने श्री भैरवनाथ मंदिर, बांडे मळा येथे गुरुपौर्णिमा उत्सव आणि शिष्यगण मेळावा उत्साहात साजरा झाला.या मेळाव्यासाठी राणी लंके, अशोक कटारिया, बाबासाहेब खिलारी, डॉ.भाऊसाहेब खिलारी, सुनीता झावरे, नारायणराव झावरे, मोहन रोकडे, अमोल उगले व भालेराव गुरुजी यांच्या प्रमुख उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढवली. अण्णासाहेब चौरे, शांताराम किनकर, भाऊसाहेब आंधळे यांनी भक्तिमय भजन कार्यक्रम सादर केला. गुरुपौर्णिमेनिमित्त राणी लंके यांच्या हस्ते गरजवंतांना वस्त्र वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सर्व पत्रकार मित्र, सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, चेअरमन, व्हाइस चेअरमन, सर्व संचालक मंडळ तसेच भैरवनाथ मित्र मंडळ, बनाई मित्र मंडळ, नवभारत मित्र मंडळ, समस्त बांडे परिवार आणि टाकळी ढोकेश्वर येथील सर्व ग्रामस्थ व शिष्यगण उपस्थित राहिल्याबद्दल श्री रामदास बांडे महाराज यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

### गुरु हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील खरा मार्गदर्शक : कर्डिले



**ढोरजळगाव :** गुरु हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील खरा मार्गदर्शक असून गुरुंच्या संस्कारातूनच आदर्श नागरिक घडतात, असे प्रतिपादन संकुलाचे मुख्य प्रशासक सचिन कर्डिले यांनी बोलताना केले. शिक्षणमहर्षी साहेबराव घाडगेपाटील शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा संकुल, ढोरजळगाव येथे गुरुपौर्णिमेनिमित्त गुरु वंदन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी गुरु महिमा सांगणारी गीते, मनोगते व सांस्कृतिक सादरीकरणातून गुरुंच्या कार्याचा गौरव केला. तनवी आहेर कु वर्षा फटांगरे, कु. डाके अनुष्का व कु. मानवी डिके यांनी विद्यार्थ्यांच्या वतीने मनोगत व्यक्त करत गुरुंच्या ऋणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रा. आशिष भारती यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांनी ज्ञान, संस्कार, शिस्त आणि गुरुंच्या मार्गदर्शनाचा आदर करून जीवनात यशस्वी व्हावे, असे आवाहन केले. यावेळी डॉ भोईटे, प्रा. सुनिल चोळके, प्रा. प्रदीप नवल, प्रा. संजय बुधवंत, संगीता झिंजुर्डे श्रीराम बडे, शरद टेमकर, विनायक सातपुते, अशोक गाढे , संदीप घोडेचोर, संगीता आहेर, स्वाती सानप उपस्थितीत होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शुक्रवार दि.३१ जुलै २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## पत्नीला बेदम मारहाण; पतीवर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील शेरी चिखलठाण येथे (दि.२९), जुलै रोजी एका संतापजनक घटनेत पतीने पत्नीला बेदम मारहाण केल्याची घटना घडली.

पती मंगेश वारे हा माल वाहतूक करून घरी आल्यावर, पत्नी शारदा वारे यांनी तुम्ही कुठे गेले होते? अशी विचारणा केली. याच कारणावरून पतीने तिला शिवीगाळ करत लाकडी दांडा आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकीही दिली.पीडित पत्नी शारदा वारे यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी पती मंगेश प्रकाश वारे यांच्याविरूद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मेरिट विसरून केलेले उद्योग आता चालणार नाहीत

### माजी मंत्री जयंत पाटील यांचे सूचक वक्तव्य

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : देशातील नागरिक विशेषत: जेनझी म्हणून ओळखली जाणारी तरुणाई आता हुशार आहे. मेरिट सोडून उद्योग झाल्याने ते चिडले.

त्यांनी आंदोलन केले आणि सरकारने त्यांच्यावर हल्ला केला. अखेर सरकारला माघार घ्यावी लागली. मेरिटला महत्त्व आहे, ते सिद्ध झाले. राजकारणातील लोकांनी आता सत्तेला हुरळून जाऊ नये, असा सूचक इशारा माजी मंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी श्रीरामपूर येथील पत्रकारिता पुरस्कार समारंभात दिला.



ज्येष्ठ पत्रकार स्वर्गीय वसंतराव देशमुख यांच्या स्मृतीनिमित्त दिला जाणारा जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कार जयंत पाटील, माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात आणि ज्येष्ठ पत्रकार यदु जोशी यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. यावेळी महादेव कुलकर्णी यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर ग्रामीण पत्रकार दिलीप खरात यांच्यासह इतर पत्रकारांचेही सन्मान झाले.

जयंत पाटील हे दिल्लीमध्ये झालेल्या तरुणांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बोलत असले तरी पत्रकारिता पुरस्कार सोहळ्यातील राजकारण त्यांच्या नजरेतून सुटले नाही.

आता वशिलेबाजी चालणार नाही, मेरिटनेच निर्णय झाले पाहिजेत. सत्ताधाऱ्यांनी गडबड गोंधळ केला तर तो जनतेच्या नजरेतून सुटणार नाही. एक आंदोलन झाले आणि संपले असे समजून चालणार नाही. जयंत पाटील म्हणाले, आमदार हेमंत ओगले यांनी आग्रहाने या कार्यक्रमाचे निमंत्रण दिले त्यांचे आभार मानतो.

काळ बदलला आहे. राजकारणाच्या पद्धती बदलल्या आहेत. त्यानुसार पत्रकारितेचे स्वरूप बदलले. मर्यादित स्वरूपात बोलण्याची, व्यक्त होण्याची व्यवस्था देशात निर्माण केली आहे. शोध पत्रकारितेचा अस्त झाला आहे का अशी शंका निर्माण झाली आहे. तरीही लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा आवाज बुलंद ठेवण्याचा प्रयत्न आजही होत असल्याचे समाधान आहे. यापुढील कामकाजासाठी तो एक मोठा धडा असल्याचे जयंत पाटील म्हणाले.

यावेळी बचत गटाच्या महिला तसेच नगरपरिषदेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सहा वर्षांपूर्वीच्या गुन्ह्यात कोतकर कुटुंबियांची निर्दोष मुक्तता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील बाभुळवेढे येथील सरपंच बाबासाहेब कोतकर व त्यांच्या कुटुंबीयांविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या फौजदारी खटल्यात नेवासा न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.

दि.१९ नोव्हेंबर २०१९ रोजी दाखल झालेल्या गुन्हा क्रमांक ७२४/२०१९ मध्ये भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६, ३२४, ३५४, ३२३, ५०४, ५०६ व ३४ अन्वये बाबासाहेब कोतकर, विकास कोतकर, छाया कोतकर व राजश्री कोतकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी संबंधित आरोपींविरुद्ध नेवासा येथील न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. खटल्याच्या सुनावणी दरम्यान फिर्यादी पक्षाचे साक्षीपुरावे, कागदोपत्री पुरावे तसेच दोन्ही बाजूंचा युक्तिवाद न्यायालयासमोर झाला.

आरोपींच्या वतीने ॲड.पांडुरंग औताडे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली, तर त्यांना ॲड.कमलेश नवले यांनी सहाय्य केले. उपलब्ध साक्षीपुरावे,कागदोपत्री पुरावे आणि दोन्ही बाजूंच्या युक्तिवादाचे सखोल परीक्षण केल्यानंतर आरोपींविरुद्धचे आरोप शंकातीतरीत्या सिद्ध होत नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे सबळ व विश्वासार्ह पुराव्याअभावी बाबासाहेब कोतकर, विकास कोतकर, छाया कोतकर व राजश्री कोतकर यांची निर्दोष मुक्तता करण्याचा निर्णय नेवासा न्यायालयाने दिला. या निकालानंतर कोतकर कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले असून, बचाव पक्षाचे कामकाज विधी तज्ञ पांडुरंग औताडे यांनी पाहिले, तर त्यांना ॲड.कमलेश नवले यांनी मोलाचे सहाय्य केले.

## तरुणीला पळवून नेणाऱ्या विवाहित तरुणावर बलात्काराचा गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : लग्नाचे खोटे आमिष दाखवून एका १८ वर्षीय तरुणीला पळवून नेऊन तिच्यावर सलग १० दिवस अत्याचार केल्याची संतापजनक घटना राहुरी तालुक्यातील मुळा धरण परिसरामध्ये घडली आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात मुख्य आरोपीवर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये पीडित तरुणी तिच्या आई-वडील मेंढ्या चारण्यासाठी जात असताना, आरोपी पांडू रामभाऊ पवार (रा. ढवळपुरी, ता. पारनेर) हा देखील तिथे येत असे. यादरम्यान दोघांची ओळख झाली आणि ते फोनवर बोलू लागले. आरोपीने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवले. मात्र, त्याचे आधीच लग्न झाले असल्याचे तरुणीला समजल्यावर तिने विरोध केला.

तेव्हा, माझे पत्नीसोबत भांडण झाले असून ती माहेरी राहत आहे, असा बनाव रचून त्याने तरुणीचा विश्वास संपादन केला. दि.१४ जुलै २०२६ रोजी सकाळी आठ वाजता आरोपीने पीडित तरुणीला तिच्या घरातून फूस लावून मोटरसायकलवर पळवून नेले. त्यानंतर जांभळी गावाच्या शिवारातील त्याच्या घरी नेऊन १४ ते २४ जुलै दरम्यान तिच्या इच्छेविरुद्ध वेळोवेळी जबरदस्तीने शरीरसंबंध प्रस्थापित केले. दि. २४ जुलै रोजी आरोपीची पत्नी तिथे आल्यावर, त्यांच्यात कोणतेही भांडण झालेले नाही हे पीडितेला समजले. जेव्हा तरुणीने आरोपीकडे लग्नाचा आग्रह धरला, तेव्हा त्याने उडवाउडवीची उत्तरे देत तिला शिवीगाळ केली आणि घडी प्रकार बाहेर सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. घाबरलेल्या पीडित तरुणीने घरी जाऊन घडलेला सर्व प्रकार आपल्या आई-वडिलांना सांगितला.

त्यानंतर नातेवाईकांसह राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तिने फिर्याद दाखल केली. पीडितेच्या फिर्यादीवरून नराधम पांडू रामभाऊ पवार याच्याविरुद्ध बलात्कारासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे करीत आहेत.

## संगमनेरचा सुपुत्र अजिंक्य रहाणेचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : भारतीय क्रिकेट संघाचा विश्वासार्ह फलंदाज व संगमनेरचा सुपुत्र अजिंक्य रहाणे यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करत आपल्या गौरवशाली कारकिर्दीला पूर्णविराम दिला आहे. शांत स्वभाव, संयमी नेतृत्व आणि संकटाच्या प्रसंगी संघाला सावरण्याची क्षमता यामुळे रहाणे यांनी भारतीय क्रिकेटमध्ये स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले.

कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० या तिन्ही प्रकारांत भारताचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी अनेक संस्मरणीय खेळी साकारल्या. विशेषतः ऑस्ट्रेलिया दौऱ्यात भारतीय संघाचे नेतृत्व करत ऐतिहासिक कसोटी मालिका विजय मिळवून देण्याची कामगिरी त्यांच्या कारकिर्दीतील सुवर्णक्षण मानली जाते. या यशामुळे रहाणे यांचे नाव भारतीय क्रिकेटच्या इतिहासात कायमस्वरूपी सुवर्णाक्षरांनी नोंदले गेले.संगमनेरसह संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाचा विषय ठरलेल्या अजिंक्य रहाणे यांनी आपल्या मेहनती, शिस्तबद्ध खेळ आणि नम्र व्यक्तिमत्त्वाच्या बळावर लाखो तरुणांना प्रेरणा दिली. त्यांच्या निवृत्तीमुळे भारतीय क्रिकेटमधील एका महत्त्वपूर्ण पर्वाचा शेवट झाला असला, तरी त्यांनी देशासाठी दिलेले योगदान, नेतृत्व आणि आदर्शवत व्यक्तिमत्त्व क्रिकेटप्रेमींच्या कायम स्मरणात राहणार आहे.

## कामगारांच्या हक्कांसाठी व्यापक संघर्ष उभारण्याची गरज : माजीमंत्री जयंत पाटील

### शिर्डी येथे महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाच्या कार्यकर्ता मार्गदर्शन शिबिरात आवाहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी / श्रीरामपूर** : कामगारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी श्रम कायद्यांमध्ये आवश्यक बदल करणे गरजेचे असून, अन्यथा कारखानदारांच्या मर्जीप्रमाणे संघटना उभ्या राहतील. त्यामुळे कामगारांच्या हक्कांसाठी व्यापक स्वरूपाची चळवळ उभारण्याची वेळ आली आहे. या लढ्यात आम्ही सर्व कामगारांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार जयंत पाटील यांनी केले. महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाच्या वतीने शिर्डी( ता. राहाता) येथे आयोजित कार्यकर्ता मार्गदर्शन शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

जयंत पाटील म्हणाले की, ज्यांना जनतेने निवडून संसदेत आणि विधानसभेत पाठवले, त्या लोकप्रतिनिधींनी कामगारांच्या हिताच्या कायद्यांवर प्रभावीपणे आवाज उठविणे अपेक्षित आहे. मात्र अनेकदा महत्त्वाच्या विषयांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दुर्दैवी चित्र आहे. व्याख्याते संजय वढावकर यांनी मांडलेले मुद्दे अत्यंत महत्त्वाचे असून, त्याबाबत सर्व स्तरांवर जनजागृती करण्याची आवश्यकता आहे. ते पुढे म्हणाले की, साखर कामगार चळवळ अधिक प्रभावी करण्यासाठी प्रत्येक आमदार आणि खासदारापर्यंत या कायद्यांची माहिती पोहोचवावी.



महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे यांच्या माध्यमातून सर्व खासदारांना निवेदन व माहितीपत्रक पाठवून या विषयावर भूमिका मांडण्याची मोहीम राबवावी. दुपारच्या सत्रात कारखानदारी आणि कामगारांची अवस्था या विषयावर संजय वढावकर यांनी तर नवीन श्रम संहिता आणि कामगारांनी घ्यावयाची दक्षता या विषयावर ॲड. ए. पी. चौगुले यांनी मार्गदर्शन केले. संजय वढावकर म्हणाले की, कामगारांच्या रास्त मागण्यांसाठी एकजुटीने संघर्ष उभारल्यास सरकारलाही त्याची दखल घ्यावी लागते. दिल्लीतील तरुणांच्या आंदोलनातून हे स्पष्ट झाले आहे.

कामगारविरोधी ठरणाऱ्या चार श्रम कायद्यांची अंमलबजावणी रोखण्यासाठी राज्यभर एकसंघ लढा उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे सरचिटणीस रावसाहेब पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्ष तात्यासाहेब काळे यांनी प्रास्ताविक केले, तर प्रमुख मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप, कार्याध्यक्ष राजेंद्र चव्हाण, अविनाश आपटे, युवराज रणवरे, अशोक बिराजदार, डी. एम. निमसे, नितीन बेनकर, प्रदीप शिंदे, प्रदीप बनगे, राजेंद्र तावरे, सयाजी कदम, संजय मोरबाळे, संजय पाटील, योगेश हंबीर, अशोकराव पवार यांच्यासह राज्यभरातील साखर कामगार संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश हापसे व चंद्रशेखर कलगी यांनी केले. उपस्थितांचे आभार महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे उपाध्यक्ष डी. एम. निमसे यांनी मानले.

## फसवणुकीच्या गुन्ह्यात फरार डॉक्टरला अटक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या फसवणुकीच्या गुन्ह्यातील २०२२ पासून फरार असलेला मुख्य आरोपी अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. डॉ. रामेश्वर विठ्ठलराव बंडगर (रा. सोयगाव, ता. उमरखेड, जि. यवतमाळ) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी रामराव त्र्यंबक ढोणे (रा. माळवाडा, पूनोद ) यांनी दि. १२ सप्टेंबर २०२२ रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपींनी नगर पुणे महामार्गावरील केडगाव शिवारात सुविधा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये लॅब सुरू करण्याच्या बहाण्याने त्यांच्याकडून सहा लाख रुपयांचा चेक आणि चार लाख रुपये रोख असे एकूण दहा लाख रुपये घेतले होते. तसेच पाच वर्षाचा करारनामा करूनही हॉस्पिटल अचानक बंद केले. आणि लॅबमधील ६ लाख ५६ हजार ५०० रुपये किमतीच्या वस्तू व डिपॉझिटची रक्कम परत न करता फिर्यादीची फसवणूक केली होती. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्यातील आरोपी डॉ. रामेश्वर विठ्ठल राव बंडगर हा घटनेपासून फरार होता. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या फरार आरोपी शोध मोहिमेअतर्गत सदर आरोपी २७ जुलै रोजी अहिल्यानगर येथे येणार असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत समजली. त्याआधारे कोतवाली पोलीस ठाण्याच्या पथकातील अंमलदार राहुल शिंदे, दौंड, सुरज कदम, सचिन लोळगे ,संकेत धीवर आणि अतुल लाटे यांनी नियोजनबद्ध सापळा रचून आरोपीला सीताफिने अटक केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन ,अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कूलबर्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख ,सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल संकपाळ, पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख आणि पोलीस पथकाने केली.

# वांजुळपोई शिवारात विहिरीत बिबट्या पडला

### वन अधिकारी फिरकलेच नाहीत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील वांजुळपोई शिवारातील दादासाहेब नाना कोळपे यांच्या शेतातील शंभर फूट असणाऱ्या विहिरीत बिबट्या पडल्याचे जमिनीचे मालक कोळपे यांच्या काल दुपारी दोन च्या सुमारास लक्षात आल्याने या भागात असणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले.



आतापर्यंत याभागात बिबट्याचे अनेकदा अनेकांना दर्शन झाले अनेकदा याभागात मेंढ्या शेळ्यांवर हल्ला करून याभागात शेळ्या मेंढ्यांचा बिबट्याने फडशा पडला अनेकदा वनविभागाकडे घटना झाल्यानंतर तक्रारी केल्यानंतर या भागात शेतकऱ्यांनी नुकसानीबाबत वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणा मुळे यावेळी चीड व्यक्त करण्यात आली.

याभागात बिबट्याचे संख्या सुमारे पाच ते सहा असून नदीकाठी या बिबट्याचे वास्तव्य आहे.त्यामुळे याभागात महिला शेतमजूर रानात कामे करण्यास धजावत नसल्याचे शेतकऱ्याचे म्हणणे आहे. ऊसात किंवा नदीकाठी बिबट्यांनी वास्तव्य केल्याने शेतकरी रात्री अपरात्री शेतात पाणी देण्यास धजत नाही त्यामुळे वन विभागाकडे अनेकदा या बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकरी ग्रामस्थानी केली मात्र यावर कुणाचेही नियंत्रण नसल्याने वनविभाग झोपेचे सोंग घेत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे.

विहिरीत पडलेला बिबट्या रात्री भक्ष्याच्या शोधात या शेतात आला असावा असा अंदाज शेतकऱ्यांनी व्यक्त केला असून, या विहिरीची खोली शभर फूट आहे. आणि विहिरीत सुमारे ५० फूट पाण्याने विहीर भरलेली आहेत. तरीही हा बिबट्या पाईपच्या आधाराने रात्री आणि दिवसभर विहिरीत जिवंत राहिला. बिबट्या विहिरीत पडलेला दिसताच शेतकरी दादासाहेब कोळपे यांनी वनविभागाला याबाबत दिली. मात्र गुरूवारी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वनविभागाचे कुणीही कर्मचारी इकडे फिरकले नसल्याचे कोळपे यांनी सांगितले.

## बनावट साठेखत करून दोन बहिणींची फसवणूक

### कर्जतच्या वकिलासह तिघांवर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : कर्जत तालुक्यातील कुंभेफळ येथील शेतजमिनीबाबत बनावट व विनानोंदणीकृत साठेखत तयार करून दोन बहिणींची फसवणूक केल्याप्रकरणी कर्जत पोलिसांनी एका वकिलासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पूनम हिरालाल गायकवाड यांच्या फिर्यादीवरून ड. संदीप शिवदास पाटील, महेंद्र शांतीलाल धोदाड आणि विजय सुनील पाटील यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात आला.




फिर्यादीनुसार, जून २०२५ मध्ये उसने दिलेले दोन लाख रुपये परत मिळाल्यानंतरही आरोपींनी त्याचा आधार घेत दबाव टाकण्यास सुरुवात केली. फिर्यादी व त्यांच्या बहिणीच्या वाट्याला आलेली गट क्रमांक १७६ मधील ८१ आर जमीन त्यांनी ४ मे २०२६ रोजी कायदेशीर खरेदीखताद्वारे अन्य व्यक्तीस विक्री केली. त्यानंतर आरोपींनी धमक्या देत जमिनीवर हक्क सांगण्याचा प्रयत्न केला.

तक्रारीनुसार, फिर्यादींची संमती न घेता जमिनीचे बनावट साठेखत तयार करून ते खरे असल्याचा बनाव करण्यात आला. त्याच्या आधारे दोन्ही बहिणींना २२ लाख रुपयांची मागणी करण्यात आली, तसेच जमीन त्यांच्या नावावर न केल्यास कायदेशीर कारवाई व जमीन बळकावण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे कर्जत तालुक्यात खळबळ उडाली असून कर्जत पोलीस पुढील तपास करीत आहेत.